रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक १५१
www.ramprahar.com
सोमवार, १८ डिसेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## ‘आकाश’ करणार एकाच वेळी चार लक्ष्यांवर मारा



**नवी दिल्ली** : आपल्या स्वदेशी शस्त्रास्त्र प्रणालींची निर्यात करण्यास उत्सुक असलेल्या भारताने मोठी मजल मारली आहे. नुकत्याच झालेल्या अस्त्रशक्ती २०२३ सरावादरम्यान, एकाच फायरिंग युनिटने एकाच वेळी चार मानवरहित लक्ष्ये नष्ट केली.एकाच फायरिंग युनिटचा वापर करून कमांड मार्गदर्शनाद्वारे एकाच वेळी चार लक्ष्य नष्ट करण्याची क्षमता असलेला भारत हा पहिला देश ठरला आहे. डीआरडीओने (संरक्षण संशोधन आणि विकास संघटना) रविवारी (दि. १७) आकाश क्षेपणास्त्राच्या सामर्थ्यांची माहिती दिली. भारत हा जगातील पहिला देश आहे ज्याकडे आकाश क्षेपणास्त्रसारखे तंत्रज्ञान आणि शक्ती आहे. डीआरडीओच्या मते, एकाच फायरिंग युनिटचा वापर करून क्षेपणास्त्रे प्रक्षेपित करण्यात आणि एकाच वेळी चार लक्ष्यावर मारा करण्याची क्षमता असलेल्या देशांमध्ये भारत आघाडीवर आहे.

अंतरंग
सीएसएमटी ते पनवेल प्रवास होणार अधिक वेगवान/२
पांढरा कांदा जानेवारीमध्ये बाजारपेठेत होणार दाखल/५
टीम इंडियाचा दक्षिण आफ्रिकेवर विजय/८

## नागपूरमधील बाजारगावात दुर्घटना
# दारूगोळा कारखान्यात स्फोट
### नऊ जण ठार; तिघे गंभीर
### मृतांची संख्या वाढण्याची शक्यता

**नागपूर : प्रतिनिधी**

नागपूरजवळील बाजारगाव येथे असलेल्या सोलर एक्सप्लॉसिव्ह कंपनीत रविवारी (दि. १७) सकाळी स्फोट झाला. या स्फोटात नऊ जण ठार, तर तीन जण गंभीर जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे.

या कारखान्यात मोठ्या प्रमाणावर दारूगोळा तसेच रसायने असल्यामुळे यात मोठी जीवितहानी झाल्याची भीती वर्तविण्यात येत आहे. कंपनीच्या सीबीएच २ युनिटमध्ये कार्यरत १२ कामगारांपैकी नऊ जणांचा मृत्यू झाला असून सीबीएच २ प्लांटची इमारत उद्ध्वस्त झाली आहे. घटनेची माहिती राज्याचे माजी गृहमंत्री तसेच विद्यमान आमदार अनिल देखमुख घटनास्थळी जाऊन त्यांनी परिस्थितीची माहिती घेतली.

या स्फोटाचे नेमके कारण समोर आले नसून पोलीस चौकशी करीत आहेत. मृतांमध्ये सहा पुरुष तर तीन महिलांचा समावेश असल्याची माहिती



समोर आली आहे. युवराज किसनाजी चारोडे बाजारगाव, ओमेश्वर किसनलाल मछिर्के चाकडोह नागपूर, मिता प्रमोद उईके अंबाडा सोनक ता. काटोल नागपूर, आरती निळकंठा सहारे ता. कामठी नागपूर, श्वेताली दामोदर मारबते कन्नमवार वर्धा, पुष्पा श्रीरामजी मानापुरे शिराळा अमरावती, भाग्यश्री सुधाकर लोनारे भुज ब्रम्हपुरी, रुमीता विलास उईके ढगा वर्धा, मोसम राजकुमार पटले पांचगाव भंडारा यांचा मृतांमध्ये समावेश आहे.

दरम्यान, या दुर्घटनेतील मृत्यूंबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तीव्र शोक व्यक्त केला आहे. मृत आणि त्यांच्या कुटुंबियांप्रति सहवेदना व्यक्त करून वारसांना पाच लाख रुपयांची मदत देण्याचेही मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले आहे.

ही कंपनी जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त औद्योगिक स्फोटक उत्पादनासाठी ओळखली जाते. कंपनीत संरक्षण क्षेत्रासाठी लागणाऱ्या दारुगोळ्यासाठी एकात्मिक सुविधा आहे. २०१८मध्येही या कंपनीमध्ये स्फोट झाला होता. त्या वेळी एका कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला होता. स्फोटानंतर ग्रामस्थांनी केलेल्या आंदोलनामुळे येथे तणाव निर्माण झाला होता. रविवारी झालेल्या स्फोटातील जखमींवर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

दुर्घटनेनंतर मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्तही तैनात करण्यात आला, तसेच कंपनी परिसर सील करण्यात आला असून कोणालाही आतमध्ये सोडले जात नव्हते. जोपर्यंत घटनास्थळ सुरक्षित असल्याचा अहवाल येत नाही, तोपर्यंत मृतदेह बाहेर काढता येणार नसल्याचे सांगण्यात आले.

> **नागपुरातील सोलार इंडस्ट्रीजमध्ये झालेल्या स्फोटात नऊ लोकांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय दुर्दैवी आहे. मी मृतकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. मृत्युमुखी पडलेल्यांच्या वारसांना पाच लाख रुपये मदत राज्य सरकारतर्फे देण्यात येईल. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यास मान्यता दिली आहे.**
> **-देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**

## उरण मतदारसंघात विकासकामांचा धडाका
### आमदार महेश बालदी यांच्या हस्ते भूमिपूजन, उद्घाटन



**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून अनेक विकासाची कामे सातत्याने सुरू आहेत. या अंतर्गत वडविहीर, लोधिवली, कलोते, कर्जत, नढाळ, हातनोली, तारवाडी, भिलवले, कोयना येथील विविध विकासकामांचे भूमिपूजन आणि उद्घाटन आमदार महेश बालदी यांच्या हस्ते रविवारी (दि. १७) करण्यात आले.

उरण विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी झटणारे आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नातून अनेक विकासाची कामे सुरू आहेत. या अंतर्गत वावर्ले येथे रस्ता काँक्रिटीकरण करणे १० लाख, कर्जत-चौक रस्ता तयार करणे १० कोटी, आंबेवाडी आणि हाशाचीपट्टी जलजीवन मिशन योजनेंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन एक कोटी २५ लाख, कलोते येथील मुख्य रस्ता काँक्रिटीकरण एक कोटी, वडविहीर गावातील बौद्धवाडा येथे सभागृह बांधणे ४० लाख, लोधिवली गावाचा मुख्य रस्ता काँक्रिटीकरण एक कोटी, नढाळ येथे अंतर्गत रस्ता काँक्रिटीकरण ३० लाख, हातनोली येथे अंतर्गत रस्ता काँक्रिटीकरण ५० लाख, भिलवले येथे जलजीवन मिशन योजनेंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन ६० लाख, तारवाडी येथे अंतर्गत रस्ता काँक्रिटीकरण ६५ लाख, कोयना येथे अंतर्गत रस्ते आणि गटारे यासाठी एक कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे. या सर्व कामांचे भूमिपूजन, उद्घाटन आमदार महेश बालदी यांच्या हस्ते करण्यात आले. **(पान २ वर..)**



## निवडक

### कोरेगाव भीमा येथे शौर्य दिन साजरा करण्यास परवानगी

**मुंबई** : कोरेगाव भीमा येथील लढाईच्या वर्धापन दिनानिमित्त साजरा होणाऱ्या कार्यक्रमासाठी राज्य सरकारला उच्च न्यायालयाने नुकतीच परवानगी दिली. २२ डिसेंबर ते ५ जानेवारी या कालावाधीत वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रम होणार आहे. ३१ डिसेंबर ते ५ जानेवारीपर्यंत सर्वसामान्यांना विजय स्तंभाच्या परिसरात प्रवेश देण्यात येईल.

### ठाकरे गटाचे सुधाकर बडगुजर यांच्यावर गुन्हा

**मुंबई** : ठाकरे गटाचे नेते सुधाकर बडगुजर यांच्याविरोधात पदाचा गैरवापर करून कंपनीला कंत्राट दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अँटी करप्शन ब्युरो (एसीबी)ने याप्रकरणी तक्रार दिली होती. सलिम कुत्ता प्रकरणात बडगुजर यांची चौकशी सुरू आहे. एसीबीने सरकारवाडा पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली होती.

## भाजपचा २०२४मध्ये ऐतिहासिक विजय होणार -पंतप्रधान मोदी



**सुरत : वृत्तसंस्था**

आज सुरत शहराच्या वैभवात आणखी एका हिऱ्याची भर पडली आहे आणि हा हिरा जगातील सर्वोत्तम आहे. आम्ही तीन राज्यात सरकारे स्थापन केली आहेत, तेलंगणातही भाजपच्या मतांच्या टक्केवारीत विक्रमी वाढ झाली आहे. यावरून २०२४च्या निवडणुकीत भाजप पुन्हा एकदा ऐतिहासिक विजय नोंदवणार असल्याचे दिसून येते, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते रविवारी (दि. १७) सूरत डायमंड एक्सचेंजचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी ते बोलत होते.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले की, आजकाल मोदींच्या गॅरेंटीची चर्चा होत आहे. देशातील कष्टकरी जनतेने 'मोदींच्या गॅरेंटी'चे वास्तवात रुपांतर करताना पाहिले आहे. गेल्या १० वर्षांत भारत आर्थिक शक्तीमध्ये १०व्या क्रमांकावरून पाचव्या स्थानावर पोहचला आहे. आता मोदींनी देशाला खात्री दिली आहे की, त्यांच्या भारत जगातील टॉप-३ अर्थव्यवस्थांमध्ये नक्कीच समावेश होईल. आम्ही तीन राज्यात सरकारे स्थापन केली आहेत. यावरून २०२४ च्या निवडणुकीत भाजप पुन्हा एकदा ऐतिहासिक विजय नोंदवणार असल्याचे दिसून येते, असा विश्वास त्यांनी या वेळी व्यक्त केला.

## मराठा आरक्षण देण्यासाठी सर्वपक्षीय बैठकीत एकमत
### मंत्री छगन भुजबळांसह नेत्यांची ठरावावर स्वाक्षरी

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठा आरक्षणावरून राज्यातील परिस्थिती चिघळत असताना या मुद्द्यांवर रविवारी (दि. १७) सर्वपक्षीय बैठक झाली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत खासदार शरद पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह सर्वपक्षीय नेत्यांची सह्याद्री अतिथीगृहावर बैठक झाली. या बैठकीत मराठा आरक्षणाविषयक ठराव मांडण्यात आला. त्यावर मंत्री छगन भुजबळ यांच्यासह बैठकीतील सर्व नेत्यांनी



स्वाक्षरी केली.

सर्वपक्षीय बैठकीत मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत सर्वांचे एकमत झाले. याबाबत कायदेशीर बाबी पूर्ण करूनच टिकणारे आरक्षण दिले जाऊ शकते व त्यासंदर्भात राज्यातील सर्वच पक्ष एकत्रितपणे काम करायला तयार आहेत. कायदेशीर कार्यवाही शक्य तितक्या लवकर करण्यात यावी, मात्र त्याला आवश्यक तो वेळ देणे गरजेचे आहे. हे सर्वपक्षीयांनी लक्षात घेणे आवश्यक आहे. राज्यामध्ये ज्या हिंसेच्या घटना घडल्या आहेत व घडत आहेत त्या अयोग्य असून यामुळे आंदोलनाची बदनामी होत आहे. याबाबत सर्वपक्षीय बैठकीत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

राज्यात कुणीही कायदा हाती घेऊ नये, राज्यातील शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवावी असे आवाहनही सर्वपक्षीय नेत्यांनी केले. **(पान २ वर..)**

## आमदार अपात्रता; आजपासून अंतिम सुनावणी

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणी सोमवार (दि. १८) पासून अंतिम टप्प्यातील सुनावणी सुरू होणार आहे. विधानसभा अध्यक्षांसमोर तीन दिवस ही सुनावणी होईल. प्रत्येकी दीड-दीड दिवस ठाकरे गट आणि शिंदे गटाच्या वकिलांना युक्तिवादाकरीता येणार आहे.

सकाळच्या सत्रातील अंतिम सुनावणीला सोमवारी सकाळी ८.३०वाजता सुरुवात होईल, तर दुपारी अध्यक्षांच्या कामकाजातील वेळेनुसार दुसऱ्या सत्रातील अंतिम सुनावणी होणार आहे. १८, १९ आणि २० डिसेंबर दरम्यान अंतिम सुनावणी पूर्ण केली जाणार आहे.

## नाताळ, नववर्षाच्या स्वागतासाठी रायगडला पसंती

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

विलोभनीय निसर्गसौंदर्य, विस्तीर्ण समुद्र किनारा, किल्ले, ऐतिहासिक व धार्मिक स्थळे यामुळे रायगड जिल्ह्याला पर्यटकांची नेहमीच पसंती असते. नाताळच्या सुट्टीत आणि नववर्षाच्या स्वागतासाठी येथील सर्व पर्यटनस्थळे हाऊसफुल्ल होण्यास सुरुवात झाली आहे. सध्या आगाऊ बुकिंग जोरात सुरू आहे. त्यामुळे सर्वच व्यावसायिक व उद्योजक सुखावले आहेत.

पुणे-मुंबईसह महाराष्ट्र व राज्याबाहेरील निरनिराळ्या ठिकाणच्या पर्यटकांची पावले रायगडकडे वळू लागली आहेत. हॉटेल व्यावसायिक,

### आगाऊ बुकिंग जोरात; किनारे गजबजले

खानावळी, छोटे-मोठे दुकानदार, वाहतूकदार, राईड्सवाले सज्ज झाले आहेत.

अलिबाग, नागाव, वरसोली, मुरूड, काशिद, श्रीवर्धन, दिवेआगर, हरिहरेश्वर येथील समुद्रकिनारे पर्यटकांना भुरळ घालत आहेत. येथे विविध राईडचा आनंदही पर्यटक घेतात. माथेरान हे थंड हवेचे ठिकाण म्हणून परिचित आहे. माथेरानमध्ये पर्यटकांची रेलचेल आहे. पर्यटकांची कोणतीच गैरसोय होणार नाही याची काळजी येथील व्यावसायिक घेत आहेत. अष्टविनायकांपैकी दोन गणपती म्हणजे खालापूर तालुक्यातील महडचा वरदविनायक आणि सुधागड तालुक्यातील पालीचा बल्लाळेश्वर. सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी व नववर्षाच्या स्वागतासाठी भाविक दर्शनासाठी गर्दी करतात.

स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड किल्ल्यावर पर्यटक मोठ्या संख्येने येत आहेत. मुरूड जंजिरा व अलिबागचा कुलाबा किल्ला व उरणजवळील घारापुरी लेणी पाहण्यासाठी प्रचंड गर्दी होत आहे.

### थंडीच्या हंगामात पोपटी पार्टी स्पेशल

सध्या पोपटीचा हंगाम सुरू आहे. त्यामुळे थर्टी फर्स्टसाठी पोपटी पार्टी आवर्जून केली जाते. अनेक हॉटेल चालक व व्यावसायिक थर्टीफर्स्टच्या सेलिब्रेशनसाठी पोपटी पार्टीचे आयोजन करून ग्राहकांना आकर्षित करीत आहेत. काही ठिकाणी चुलीवरचे जेवण तर काही ठिकाणी कौल चिकनचा बेतसुद्धा असणार आहे.

### फार्महाऊस व कॉटेजला प्राधान्य

थर्टीफर्स्ट सेलिब्रेशन व नाताळच्या सुट्टीत आनंद लुटण्यासाठी समुद्रकिनाऱ्यावरील व निसर्गाच्या सान्निध्यात असलेल्या कॉटेज फार्महाऊसना अधिक पसंती आहे. मित्रपरिवारासह मौजमजा करण्यासाठी फार्महाऊसला मागणी आहे.



## श्रीलंकेच्या संसदीय शिष्टमंडळाने दिली अजिंठा लेण्यांना भेट

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

श्रीलंका देशाचे संसदीय शिष्टमंडळ रविवारी (दि. १७) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील अजिंठा लेण्यांना भेट देण्यासाठी आले होते.

या शिष्टमंडळाने अजिंठा लेणीला भेट देत लेण्यांच्या कोरीव कामाचे कौतुकदेखील केले. यापूर्वीदेखील वेगवेगळ्या देशातील महत्त्वाच्या नेत्यांनी अजिंठा आणि वेरूळ लेण्यांना भेट दिली आहे.

या शिष्टमंडळात श्रीलंकेच्या संसदीय शिष्टमंडळाचे नेते तथा श्रीलंकेच्या संसदेचे अध्यक्ष महिंदा यापा अबेवर्देना, त्यांची पत्नी सुश्री नेलुम ललना यापा अबेवर्धना, मुख्य व्हीप प्रसन्न रणतुंगा, खासदार जीवन ठोंडमन, उपसभापती अजित राजपक्षे, समितीचे उपाध्यक्ष अंगजन रामनाथन, खासदार निरोशन परेरा, वीरसुमना वीरासिंघे, मो. मुझम्मील, उदयकुमार, वरुणा प्रियंथा लियानागे, जगथ समरविक्रम, एम. रामेश्वरन, महासचिव कुशाणी अनुषा



### कोरीव काम बघून गेले भारावून

रोहनाडीरा, उपसचिव चामिंडा कुलरत्ने, सहाय्यक संचालक प्रशासन जयलथ परेरा, डॉ. चमीरा यापा अबेवर्देना, जिनलाल चुंग, उपसचिव मुकेश कुमार, एल्डोस मॅथ्यू पुन्नूज, कोलंबोमधील भारतीय उच्चायुक्तालयातील अधिकारी यांचा समावेश होता.

# सीएसएमटी ते पनवेल प्रवास नव्या वर्षात होणार अधिक वेगवान

## रुळांची वेगक्षमता वाढणार; मध्य रेल्वेचा मोठा निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते पनवेलदरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा प्रवास नव्या वर्षात अधिक वेगवान होणार आहे. हार्बर मार्गासह ट्रान्सहार्बर आणि नेरुळ-खारकोपरदरम्यान रुळांची वेगक्षमता १०५ किलोमीटर प्रतितास करण्याचा निर्णय मध्य रेल्वेने घेतला आहे. यामुळे हार्बर मार्गावरील प्रवासात १५ मिनिटांची बचत शक्य होणार आहे.



सीएसएमटी ते पनवेलदरम्यान सध्या ताशी ८० किमी वेगाने लोकल धावतात. या वेगाने सीएसएमटी ते पनवेल अंतर पार करण्यासाठी ८० मिनिटे लागतात. हार्बर मार्गावरील प्रवाशांचा प्रवास वेळ वाचवण्यासाठी ताशी १०५ वेग निश्चित करण्यात आला आहे. या वेगामुळे सीएसएमटी ते पनवेल अंतर ६५-७० मिनिटांत पूर्ण करणे शक्य होणार आहे, असे वरिष्ठ रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले.

रेल्वेरुळांचे मजबूतीकरण, रुळांलगत असलेल्या झोपड्या हटवणे आणि ओव्हरहेड वायरमध्ये आवश्यकतेनुसार बदल या गोष्टी वेग वाढवण्यासाठी करण्यात येणार आहेत. नव्या वर्षाच्या पहिल्या तिमाहीपर्यंत कामे पूर्ण करून वेग वाढवण्याचे नियोजन आहे. कामे पूर्ण झाल्यावर नव्या वेगाने चाचणी घेण्यात येईल. त्यानंतर प्रवासी वाहतुकीसाठी नवा वेग लागू करण्यात येणार आहे. सीएसएमटी-पनवेलसह सीएसएमटी-बेलापूर दरम्यानच्या प्रवासवेळेतही काही मिनिटांची बचत अपेक्षित आहे.

ट्रान्सहार्बरवरील ठाणे-वाशी, नेरुळ-खारकोपर आणि कर्जत ते खोपोलीदरम्यानच्या मार्गांवर वेग वाढवण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे हार्बरसह ट्रान्सहार्बर प्रवाशांच्या वेळेतही अंशतः घट अपेक्षित आहे.

मध्य रेल्वेच्या हार्बर मार्गावर सीएसएमटी ते पनवेलदरम्यान १८८ आणि सीएसएमटी ते बेलापूरदरम्यान ७९ लोकल फेऱ्या धावतात. गाड्यांचा वेग वाढल्यास अतिरिक्त लोकल फेऱ्या चालवणे शक्य आहे का, याबाबत अद्याप निर्णय घेण्यात आलेला नाही.

मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावर लोकल फेऱ्या ताशी शंभरपेक्षा जास्त वेगाने धावत्या आहेत. हार्बर मार्गावर केवळ ताशी ८०च्या वेगाने लोकल धावतात. हार्बर मार्गावरील अतिरिक्त जलद लोकल सुरू करावी आणि गाड्यांचा वेग वाढवावा, अशी मागणी प्रवाशांकडून सातत्याने केली जात आहे. अखेर उशिरा का होईना वेग वाढवण्याच्या हालचाली मध्य रेल्वे प्रशासनाने सुरू केल्या आहेत. प्रशासनाने तातडीने अंमलबजावणी करून प्रवाशांसाठी वेगवान लोकल उपलब्ध करून द्याव्यात, अशी प्रतिक्रिया हार्बर मार्गावरील नियमित प्रवासी योगेश ढगे यांनी व्यक्त केली.

टिळकनगर ते पनवेलदरम्यान लोकल वेग वाढवण्यात येणार आहे. सीएसएमटी ते टिळकनगर दरम्यान दोन स्थानकांमधील अंतर कमी आहे. यामुळे कमाल वेग गाठणे लोकलला शक्य होत नाही. टिळकनगर ते गोवंडी दरम्यान रुळांलगत दाटीवाटीने झोपडपट्टी आहे. परिणामी रेल्वेरूळ ओलांडणाऱ्यांचे प्रमाण या विभागात अधिक आहे. सर्वसामान्यांच्या सुरक्षिततेसाठी सीएसएमटी ते टिळकनगर दरम्यान वेगमर्यादा जैसे थे ठेवण्यात आली आहे.

# चिपळूणमध्ये मुलीवर लैंगिक अत्याचार

## दोन तासानंतर आली शुद्धीवर

**चिपळूण : प्रतिनिधी**

इयत्ता दहावीत शिकणाऱ्या मुलीवर लैंगिक अत्याचार झाला आहे. अत्याचारानंतर ही मुलगी तब्बल दोन तासांपेक्षा अधिक वेळ बेशुद्ध अवस्थेत होती. शुद्धीत आल्यानंतर तिने पोलीस पालकांच्या मदतीने पोलिस ठाण्यात धाव घेतली. रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळुण तालुक्यात ही धक्कादायक घटना घडली आहे. शाळकरी मुलीवर झालेल्या या अत्याचारामुळे चिपळूण हादरले आहे. या घटनेमुळे महिलांच्या सुरक्षेबाबात प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

चिपळूण मधल्या कोकरे गावात मध्ये माणुसकीला काळीमा फासणारी ही घटना घडली आहे. दहावी मध्ये शिकणाऱ्या एका मुलीवर बलात्कार केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली. अधिक तपास सावर्डा पोलीस करत आहेत. दहावी शिकणाऱ्या या मुलीचा नंबर संगमेश्वर तालुक्यातील एका मुलाला मिळाला होता. यानंतर हा मुलगा पीडित मुलीला कॉल करून त्रास देऊ लागला. काही दिवसानंतर हा मुलगा मुंबईतून थेट चिपळूण येथे आला मुलीला कॉल करून भेटायला बोलावले.

भेटायला आल्यानंतर या मुलाने पीडित मुलीला जबरदस्तीने बाईकवर बसून आपल्या मित्राच्या घरी घेऊन गेला. याच ठिकाणी त्याने मुलीवर बलात्कार केला. त्यानंतर मुलगी बेशुद्ध अवस्थेत पडून त्याच ठिकाणी राहिली. अडीच तासाच्या नंतर मुलगी शुद्धीवर आल्यानंतर मुलीने आपलं घर गाठलं आणि सगळा प्रकार आपल्या वडिलांना सांगितला. त्यानंतर तातडीने वडिलांनी सावर्डा पोलीस स्टेशन गाठलं आणि संबंधित आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला. सावर्डा पोलिसांनीदेखील तातडीने पहिल्यांदा एका आरोपीला अटक केली. त्यानंतर दुसऱ्या आरोपीलादेखील ताब्यात घेण्यात आले.

पोलिसांनी या संबंधित पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल केला असून सध्या दोन्ही आरोपी हे सावर्डा पोलीस स्टेशनच्या ताब्यात आहेत. दोन्ही आरोपींना अटक करून न्यायालयात हजार करण्यात आले. दोन्ही आरोपींना चिपळूण न्यायालयाने चार दिवसांची पोलीस कस्टडी दिली आहे. पीडित मुलीची प्रकृती गंभीर असल्याने पीडित मुलीवर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



**पनवेल : आयुष्यमान भारत प्रधानमंत्री आरोग्य योजनेंतर्गत सवणे येथे रविवारी आदिवासी व इतर समाजातील १०४ नागरिकांचे आयुष्यमान भारत प्रधानमंत्री कार्ड काढण्यात आले. याचबरोबर मोफत शिलाई मशीन महिलांसाठी विश्वकर्म योजनेचा लाभ आदिवासी व इतर समाजातील २८ महिलांना मिळवून देण्यात आला. या वेळी आमदार महेश बालदी, माजी जि. प. सदस्य ज्ञानेश्वर घरत, सामाजिक कार्यकर्ता भगवान देशमुख, धनाजी निरगुडा, राघो वाघ, मधुकर वाघ, राजा पवार, नरेश वाघ, तानाजी निरगुडा, कृष्णा कोंडीलकर आदी उपस्थित होते.**



# पुण्यातील सवाई गंधर्व महोत्सवात लागली आग

**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यात सवाई गंधर्व संगीत महोत्सवा दरम्यान आगीची घटना घडली आहे. कार्यक्रम सुरू असतानाच कार्यक्रमाच्या ठिकाणी आग लागल्याची धक्कादायक घटना घडली. सुदैवाने कुठलीही हानी झाली नसल्याचं समोर आले.

आग छोट्या स्वरूपाची असल्यानं कुठलेही नुकसान नाही. रंगमंचाच्या मागे असणाऱ्या एका खोलीत शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची घटना घडली.

त्यानंतर अवघ्या पंधरा मिनिटात आगीवर नियंत्रण मिळवण्यात आयोजकांना यश आलं, पण अचानक आग लागल्याने कार्यक्रमाच्या ठिकाणी धावपळ उडाली होती. पंधरा मिनिटात आगीवर नियंत्रण आता सर्व काही सुरळीत सुरू असल्याची आयोजकांची माहिती दिली आहे.

# द्रोणागिरी हायस्कूल करंजा येथे कायदेविषयक जनजागृती शिबिर

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील द्रोणागिरी हायस्कूल करंजा मराठी व सेमी इंग्रजी माध्यम येथे शुक्रवारी (दि. १५) उरण तालुका विधी समिति व उरण तालुका वकील संघटना यांचे विद्यमाने कायदे विषयक जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते कार्यक्रमाचे अध्यक्ष उरण बार असोशिएशनचे अध्यक्ष अ‍ॅड. डी. व्ही. नवाळे हे होते.



या वेळी शिबिरात पोस्को, एडस् ग्राहक हक्क व त्याचा कायदा इत्यादी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. या शिबिरात वल्ड हुमेण राइट डे या विषयी अ‍ॅड. चेतन म्हात्रे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. पोस्को अ‍ॅण्ड अ‍ॅडस डे या विषयावर अ‍ॅड पराग म्हात्रे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. नॅशनल कॅन्जुमर डे या विषयावर अ‍ॅड योगिता म्हात्रे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. अ‍ॅड. रोहन म्हात्रे यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या वेळी विद्यालयाचे चेअरमन सीताराम नाखवा, विद्यालयाच्या मुयाध्यापिका सुरेखा म्हात्रे, उरण बार असोशिएशनचे अध्यक्ष अ‍ॅड. डी. व्ही. नवाळे, अ‍ॅड. चेतन म्हात्रे, अ‍ॅड. पराग म्हात्रे, अ‍ॅड. योगिता म्हात्रे, अ‍ॅड. रोहन म्हात्रे व शिक्षक वर्ग उपस्थित होते.

# उरण आवरे गावातील माता गटांसोबत युएसएच्या पाहुण्यांनी साधला संवाद

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील आवरे गावात नुकतेच युएसएवरून आलेल्या पाहुण्यांनी माता गट आणि हमारा गावचे उपक्रम घेतले समजून.

समग्र शिक्षा, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई आणि प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने निपुण महाराष्ट्र हे अभियान प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मूलभूत भाषिक आणि गणितीय कौशल्य प्राप्त करण्यासाठी मातापालक गटाच्या सहभागाने राज्यभर राबविले जात आहे. याच माता गट आणि उरण मधील आमचे गाव हा उपक्रम समजून घेण्यासाठी युएसएवरून पाहुणे आले होते.



या भेटीचे उद्देश्य प्रथम एज्युकेशन फाऊंडेशनचे उरण मध्ये चालत असलेल्या उपक्रमांची माहिती घेणे यात शाळेत प्रत्यक्ष शाळा पूर्व तयारी मेळावा डेमो, शाळेतील लर्निंग कॅम्प, प्रत्यक्ष गावात जावून माता गटांना भेटी देणे होता, आणि त्यांच्या सोबत संवाद साधणे होता. माता गटांसोबत आलेल्या पाहुण्यांनी छान संवाद साधला.

युएसएया भेटी साठी डिनयार डेव्हिट्रे (डिनी) - जागतिक बिझनेस सल्लागार आणि प्रथम एज्युकेशन फाऊंडेशनचे वाईस चेअरमन (अमेरिका युएसए), स्मितीन ब्रीद - बालशिक्षण आणि संगोपन तज्ञ, प्रथम एज्युकेशन, हेमलता ससाणे - कार्यक्रम समन्वयक (निपुण महाराष्ट्र), प्रथम, भोजराज क्षीरसागर - कोकण विभाग कार्यक्रम समन्वयक (आमचे गाव) प्रथम, उरण पेण ब्लॉकमधील प्रथम प्रतिनिधी आणि शाळेतील मुख्याध्यापक बबन पाटील आणि सर्व शिक्षक वृंद, शाळा वेवस्थापन कमिटी, आवरे ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंच निरा पाटील या सर्वांच्या उपस्थितीत आलेले पाहुण्यांचे आभार प्रदर्शन झाले आणि कार्यक्रमाची सांगता झाली.

या संवादादरम्यान त्यांनी युएसएवरून आलेल्या पाहुण्यांनी आवरे गावात राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे कौतुक केले.

## पान १ वरुन

### उरण मतदारसंघात विकासकामांचा धडाका

या वेळी भाजपचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, रामदास ठोंबरे, खालापूर तालुकाध्यक्ष प्रवीण मोरे, चौक ग्रामपंचायतीच्या सरपंच रितू ठोंबरे, गणेश मुकादम, बोरगाव ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच जागृती मोरे, उंबवाडी बेरोसेच्या सरपंच पार्वती भस्मा, बोरगावचे माजी सरपंच प्रितेश मोरे, उपसरपंच कमळू पारधी, तुपगावचे सरपंच रवींद्र कुंभार, अरुण वावरले, मंदार उतेकर, विजय काईनकर, गोविंद पिरकट, सचिन ठोंबरे, निलेश ठोंबरे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

### मराठा आरक्षणाबाबत सर्वपक्षीय बैठकीत एकमत

त्याचसोबत सर्व प्रयत्नांना उपोषणकर्ते मनोज जरांगे-पाटील यांनीही सहकार्य करावे व आपले उपोषण मागे घ्यावे, असे आवाहन सर्वपक्षीय बैठकीतून नेत्यांनी केले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार शरद पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, माजी मंत्री अनिल परब, आमदार जयंत पाटील (शेकाप), सुनील प्रभू, खासदार सुनील तटकरे, प्रशांत इंगळे, काँग्रेसचे नाना पटोले, बाळासाहेब थोरात, राष्ट्रवादीचे जयंत पाटील, राजेश टोपे, कपिल पाटील, राजू पाटील, सदाभाऊ खोत, जोगेंद्र कवाडे, रेखा ठाकूर, सुलेखा कुंभार, राजेंद्र गवई, गौतम सोनावणे, सचिन खरात, बाळकृष्ण लेंगरे, आमदार रवी राणा, मंत्री चंद्रकांत पाटील, छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, गिरीश महाजन, शिवसेनेचे संजय शिरसाट, राधाकृष्ण विखे पाटील, दादा भुसे या नेत्यांनी या ठरावावर सह्या केल्या आहेत.

# जानेवारीमध्ये वेध अलिबाग कार्यक्रम

**अलिबाग : प्रतिनिधी**

विद्यासान प्रतिष्ठान आणि प्रकाशवाटा यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या १४ जानेवारीला वेध अलिबाग या कार्यक्रमाचा आयोजन करण्यात आले आहे. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पाच प्रतिभावंतांची ओळख यानिमित्ताने अलिबाग करांना करण्याची संधी मिळणार असल्याचे कार्यक्रमाचे संयोजक डॉ. राजीव धामणकर यांनी दिली.

ते आदर्श पतसंस्था येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते यावेळी डॉक्टर रिटा धामणकर, स्थापत्य अभियंता मिलिंद चव्हाण आणि आदर्श पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजित पाटील उपस्थित होते.




शाळकरी, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांसाठी हा कार्यक्रम आयोजित केला जाणार आहे. अंधत्वावर मात करत संशोधन कार्य करणाऱ्या आणि वेगवेगळ्या वस्तूंचे पेटंट मिळवणाऱ्या सागर पाटील, टाकाऊ प्लास्टिक पासून टिकाऊ वस्तूंची निर्मिती करणाऱ्या आणि पर्यावरण संवर्धनाचा वसा घेतलेल्या अमिता देशपांडे, भारताचा लेक मॅन अशी ओळख असलेले आनंद मिलिंगवाड, हॉलीवुड चित्रपटांसाठी सेट उभारणारे, कला दिग्दर्शकींम्हणून स्वतःची ओळख निर्माण करणारे दिलीप मोरे, आणि कोकणचा रान माणूस म्हणून प्रसिद्ध असलेला प्रसाद गावडे यांची ओळख या निमित्ताने उपस्थित त्यांना करून दिली जाणार आहे. सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी या सर्वांची मुलाखत घेणार आहेत. अलिबागमध्ये पहिल्यांदाच या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन यानिमित्ताने डॉ. धामणकर यांनी केले आहे.

# कोकण ज्ञानपीठ महाविद्यालयाचा सन्मान

**उरण : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत राज्यभरामध्ये उभारण्यात येणाऱ्या सेंटर ऑफ एक्सलन्स यादी मध्ये कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालय उरण यांची निवड करण्यात आली आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बळीराम एन. गायकवाड आणि करिअर कट्टा चे समन्वयक डॉ. जगताप एच. के. यांचा सन्मान १२ जानेवारी २०२४ रोजी बारामती येथे उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या संचालकांच्या उपस्थितीत प्रमाणपत्र आणि निधीचा धनादेश देऊन होणार आहे. कोकण ज्ञानपीठ महाविद्यालय विविध क्षेत्रात उत्तुंग यश प्राप्त करीत आहे,आणि विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त संधी मिळाव्यात म्हणून महाविद्यालय प्रयत्नशील असते.

यामुळेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बळीराम गायकवाड, समन्वयक डॉ. जगताप एच. के. यांचे अभिनंदन होत आहे. कॉलेजच्या या उपक्रमास संस्थेचे सर्व पदाधिकारी, महाविद्यालय विकास समिती सर्व सदस्य, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी यांचे मार्गदर्शन लाभले आहे. आणि सर्व विद्यार्थ्यांचे सहकार्य मिळाले आहे.

# गुणवत्तेसाठी पालक, विद्यार्थी, शिक्षक समन्वय आवश्यक -अरुणशेठ भगत

## गव्हाण विद्यालयात दहावीचा पालक मेळावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वृद्धीसाठी विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांचा तिहेरी समन्वय अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी व समन्वय समिती सदस्य अरुणशेठ भगत यांनी केले.

संस्थेच्या श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये आगामी बोर्ड परीक्षेला प्रविष्ट होत झालेल्या एस.एस.सी. अर्थात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी पालक मेळावा आयोजित करण्यात आला होता. या पालक मेळाव्याच्या अध्यक्षपदावरून बोलताना विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत पुढे म्हणाले, परीक्षेच्या ऐन उंबरठ्यावर आपण आपल्या गुणवत्ता वृद्धीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व उपाययोजनांचा अवलंब करणे अभिप्रेत आहे आणि त्यासाठी पालकांची सजगता ही अत्यंत महत्त्वाची बाब असल्याचं त्यांनी अधोरेखित केले. इयत्ता दहावीच्या यावर्षीच्या एस.एस. सी.बोर्ड परीक्षेस प्रविष्ट विद्यार्थ्यांचा वर्गनिहाय पालक मिळावे विद्यालयाच्या सभागृहात झाले.




या वेळी या मेळाव्याचे अध्यक्षपदावरून पदावरून बोलताना विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी व समन्वय समिती सदस्य श्री अरुणशेठ भगत यांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वृद्धीसाठी आवश्यक असणाऱ्या उपाययोजना संदर्भात ऊजंहापोह करून सविस्तर चर्चा केली आणि पालकांच्या काही समस्या असतील विद्यार्थ्यांच्या काही समस्या असतील तर त्यांनाही बोलते केले.

वर्गनिहाय पालक मेळाव्यास अरुणशेठ भगत यांच्यासह विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी तसेच गव्हाण ग्रामपंचायतचे उपसरपंच विजय घरत, विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य व लाईफ मेंबर रवींद्र भोईर, इयत्ता दहावी अ, ब आणि क ह्या वर्गांचे वर्गशिक्षक अनुक्रमे चित्रलेखा पाटील, सागर रंधवे व संदीप भोईर तसेच पालक, विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर रंधवे यांनी केले तर प्राचार्य गोवर्धन गोडगे यांनी आभार मानले.

# भाजप पनवेल शहर दक्षिण भारतीय सेलची कार्यकारणी जाहीर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप पनवेल शहर दक्षिण भारतीय सेलची २०२३ – २०२६ या वर्षासाठी नव्याने कार्यकारणी जाहीर करण्यात आली आहे. या वेळी भारतीय जनता पक्षाचे पनवेल शहर अध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक अनिल भगत यांच्या हस्ते कार्यकारणी सदस्यांना नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले.

या वेळी सतीश राजू यांची सहसंयोजकपदी आणि विद्या श्रीकुमार यांची सह निमंत्रक पदी निवड करण्यात आली आहे. तर समिती सदस्य पदी मिस्टर सेल्वराज, रेणुका शेट्टे, सुनंदा सपलिगा, वारिजा गुजरन, विजयकुमार थाटीकोंडा, रत्ना. आर. चौटा, अरुणाचलम, विनोदा शेट्टी, शारदा कुंदर, राजेश्वरी उन्नीकत यांची निवड करण्यात आली आहे.

या सर्व नवनियुक्त पदाधिकारकऱ्यांना पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत यांच्या हस्ते नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले आहे. या वेळी भाजप पनवेल शहर मंडळाचे दक्षिण भारतीय सेल संयोजक तारानाथ शेट्टी आदी उपस्थित होते.



# पनवेलमधील राजिप शाळांमध्ये शिक्षकांची १५४ पदे रिक्त

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील २४६ रायगड जिल्हा परिषद शाळांमध्ये १५४ शिक्षकांची पदे रिक्त आहेत. त्यामुळे अनेक शाळांमध्ये एका शिक्षकाला दोन शिक्षकांची जबाबदारी पार पाडावी लागत आहे. परिणामी शासनाने राजिप शाळांमध्ये शिक्षक भरती करावी, अशी मागणी वारंवार केली जात आहे.

राजिप शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे गेल्या अनेक वर्षांपासून भरण्यात आलेली नाहीत. पनवेल तालुक्यात एकूण २४६ राजिप शाळा आहेत.

पनवेल तालुक्यात मराठी आणि उर्दू शाळांसाठी ९९७ शिक्षक पदे मंजूर आहेत. यापैकी ८६१ पदे भरलेली आहेत. तर शिक्षकांची १५४ पदे रिक्त आहेत. राजिप मराठी शाळांमध्ये ७३८ पैकी ६७८ उपशिक्षक, १७२ पैकी १४३ पदवीधर आणि ४७ पैकी ११ मुख्याध्यापकांची पदे भरलेली आहेत. तर उर्दू शाळांमध्ये २९ पैकी २३ उपशिक्षक, ९ पैकी ६ पदवीधर पदे भरली आहेत. राजिप मराठी शाळेत १४३ शिक्षकांची तर उर्दू शाळेमध्ये शिक्षकांची ११ पदे रिक्त आहेत. शिक्षक भरती झालेली नसल्याने १५४ शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत. त्यामुळे एका शिक्षकाला अनेक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागत आहेत.

दुसऱ्या शिक्षकाची कामेदेखील एका शिक्षकाला करावी लागत आहेत. त्यामुळे शिक्षकांवर प्रचंड ताण येत असल्याचे समोर आले आहे. अनेक शाळांमध्ये एक किंवा दोन शिक्षक असल्याने त्यांना एकाच वेळी अनेक वर्गांना शिकवावे लागते. याशिवाय अशैक्षणिक कामेदेखील करावी लागत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी पुरेसा वेळ उपलब्ध होत नसल्याची तक्रार शिक्षकांकडून केली जात आहे.

# खारघरमधील हिरानंदानी सर्कल होणार खड्डेमुक्त

**पनवेल : वार्ताहर**

खारघर वसाहतीचे प्रवेशद्वार असलेल्या हिरानंदानी सर्कल मधील चारही बाजूच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करण्यात येणार असल्यामुळे खारघरमधील रहिवाशांची खड्ड्यांतून सुटका होणार आहे.

खारघर वसाहतीचे प्रवेशद्वार असलेल्या हिरानंदानी पुलाखालून पनवेल येथून सीबीडी बेलापूर येथे, सीबीडी–बेलापूर कडून पनवेल आणि खारघर वसाहतीतून बाहेर आणि खारघर वसाहतीत प्रवेश करणाऱ्या एच आकार असलेल्या चारही बाजूच्या रस्त्यांवर वाहनांची वर्दळ असते. वाहनांच्या वर्दळीमुळे रस्त्यावर नियमितपणे खड्डे पडत असतात. विशेष म्हणजे पावसाळ्यात हिरानंदानी सर्कल येथे मोठ्या प्रमाणात खड्डे होतात.खड्ड्यांमुळे वाहनांचा वेग कमी असतो. त्यात चोहीकडून येणाऱ्या वाहनांमुळे वाहतूक कोंडी होते. वाहतूक कोंडी होवू आणि अपघात होवू नये म्हणून अनेक वेळा खारघर वाहतूक पोलिसांनी हिरानंदानी सर्कल येथील खड्डे



बुजवून वाहतूक सुरळीत केली आहे.दरम्यान, हिरानंदानी सर्कल आणि खारघर वसाहतीच्या प्रवेशद्वारावरील रस्ते सिमेंट कॉंक्रिटीकरण करुन कायमचे रस्त्यावरील खड्डे दूर करावेत, अशी मागणी खारघर मधील नागरिकांकडून केली जात होती.

अखेर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सहा कोटी रुपये खर्च करुन खारघर वसाहतीचे प्रवेशद्वार असलेल्या हिरानंदानी सर्कल मधील चारही बाजूच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करण्याच्या कामाला सुरुवात आल्यामुळे खारघर मधील नागरिक समाधान व्यक्त करीत आहेत. हिरानंदानी पुलाखालील एच आकार रस्त्यावर सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्यात येणार असून, या कामाला चार ते पाच महिने लागणार आहेत.

**खारघर मधील हिरानंदानी पुलाखालील चारही बाजूच्या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करण्यात येणार आहे. येथील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी खारघर वाहतूक पोलिसांचे प्रयत्न सुरु असून, नागरिकांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याची गरज आहे**

**–संतोष काणे,**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक–**
**खारघर वाहतूक शाखा.**

# ऑल इंडिया डान्स कॉम्पिटिशनचे उद्घाटन

**उरण : वार्ताहर**

सुधीर घरत सामाजिक संस्था नवघर–उरणच्या वतीने सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शैलजा सुधीर घरत यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शनिवारी (दि.१६) जेएनपीए बंदर वसाहतीमधील मल्टीपर्पज हॉल येथे ऑल इंडिया डान्स कॉम्पिटिशन २०२३ चे आयोजन करण्यात आले होते. या नृत्य अविस्कार स्पर्धेचे उद्घाटन रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष पी.जे. पाटील उर्फ डडी यांच्या हस्ते करण्यात आले.

उरण तालुक्यातील गोरं गरीबांच्या उन्नतीसाठी झटणारी सुधिर घरत सामाजिक संस्था नवघर–उरण हि संस्था असून या संस्थेने क्रीडा, सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या संस्थेच्या महिला पदाधिकारी शैलजा सुधीर घरत यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आदिवासी वस्तीवर, आश्रम शाळांमध्ये विविध प्रकारचे खेळ तसेच अन्नदान या उपक्रमाचे आयोजन केले होते. तसेच देशभरातील नृत्य कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी शनिवारी (दि. १६) ऑल इंडिया डान्स कॉम्पिटिशन २०२३ या नृत्य अविस्कार स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत देशभरातील नृत्य कलाकारांनी मोठ्या उत्साहात आपला सहभाग दर्शविला होता. पारितोषिक पटकावणाऱ्या स्पर्धकांना मानाची ट्रॉफी तसेच उत्कृष्ट पारितोषिक देऊन गौरविण्यात आले आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन पी जे पाटील उपाध्यक्ष रयत शिक्षण संस्था सातारा यांच्या हस्ते करण्यात आले. तर रंगमंचाचे उद्घाटन अमित घरत यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. या वेळी उद्योगपती किसन शर्मा, उद्योगपती दौलत घरत, सामाजिक कार्यकर्ते तथा कामगार नेते सुधीर घरत, भाजपचे जिल्हा चिटणीस चंद्रकांत घरत, ट्रा.से.भाजपा जिल्हा सरचिटणीस प्रशांत पाटील, मा. उपसभापती महादेव बंडा, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष निळकंठ घरत, कामगार नेते किरीट पाटील, जेएनपीए बंदर ट्रस्टी रवींद्र पाटील, महिला जिल्हा उपाध्यक्षा संगिता पाटील, विकास नाईक, उद्योगपती एम. बी. ठाकूर, किरण पाटील, सीमा घरत, ॲड. भार्गव पाटील, मनोज भगत, सुदीन पाटील, दीपक भोईर, महेश घरत, संकेत घरत उपस्थित होते.

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून करणं घबाडे, संतोष अंबरने यांनी काम पाहिले तर निवेदक म्हणून दिवेश शिगवणकर यांनी तर सूत्रसंचालन प्रा. संगीता प्रफुल्ल माळी यांनी काम पाहिले होते.




## बंद खोलीत आढळला मृतदेह

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील बंबईपाडा येथील एका खोलीत गळा चिरलेल्या अवस्थेत एका व्यक्तीचा मृतदेह रविवारी सकाळी आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

व्यक्तीचे नाव रमेश हे असून अंदाजे वय ३५ ते ४० दरम्यान आहे. हा व्यक्ती गेल्या काही दिवसापासून आजारी होता. तसेच मनोरुग्ण असल्याचे समजते व तो त्या भागातील एका कॉरीवर कामाला होता. त्याचा मृतदेह तेथे असलेल्या बैठया चाळीतील एका खोलीत गळा चिरलेल्या अवस्थेत आढळून आला आहे. तसेच त्याच्या मृतदेहाच्या बाजूला चाकू आढळला आहे.

या घटनेची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन आजूबाजूला या व्यक्तीबाबत चौकशी सुरू केली आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी केंद्रीय मंत्र्यांसोबत सकारात्मक चर्चा

**उरण : बातमीदार**

भारतीय पोर्ट अँड डॉक मजदूर महासंघ ही कामगारांच्या कल्याणासाठी रात्रंदिवस कार्यरत असून ही संघटना भारतातील सर्वात मोठी संघटना असलेल्या भारतीय मजदूर संघाशी संलग्न माहे.

संघटनेच्या माध्यमातून कामगारांचे अनेक प्रश्न मार्गी लागले असून काही प्रश्न प्रलंबित आहेत. त्या अनुषंगाने प्रलंबित प्रश्न, समस्या सोडविण्यात याव्यात यासाठी भारतीय पोर्ट आणि डॉक महासंघाचे राष्ट्रीय सरचिटणीस सुरेश पाटील तसेच राष्ट्रीय कोषाध्यक्ष सुधीर घरत यांनी केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक यांची नुकतीच दिल्लीत भेट घेतली व त्यांच्या सोबत कामगारांच्या समस्यावर चर्चा केली. यावर कामगारांच्या समस्या लवकरच मार्गी लावण्याचे आश्वासन मंत्री श्रीपाद नाईक यांनी कामगार नेते सुरेश पाटील, कामगार नेते सुधीर घरत यांना दिले.



भाजप पनवेल शहर दक्षिण भारतीय सेल मंडळाची २०२३ – २०२६ या वर्षासाठी नव्याने कार्यकारणी जाहीर करण्यात आली आहे. या वेळी भारतीय जनता पक्षाचे पनवेल शहर अध्यक्ष तथा पनवेल महानपालिकेचे माजी नगरसेवक अनिल भगत यांच्या हस्ते कार्यकारणी सदस्यांना नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले.

यावेळी सतीश राजू यांची सहसंयोजकपदी आणि विद्या श्रीकुमार यांची सह निमंत्रक पदी निवड करण्यात आली आहे. तर समिती सदस्यपदी मिस्टर सेल्वराज, रेणुका शेट्टे, सुनंदा सपलिगा, वारिजा गुजरन, विजयकुमार थाटीकोंडा, रत्ना.आर. चौटा, अरुणाचलम, विनोदा शेट्टी, शारदा कुंदर, राजेश्वरीउन्नीकत यांची निवड करण्यात आली आहे.

या सर्व नवनियुक्त पदाधिकारकऱ्यांना पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत यांच्या हस्ते नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले आहे. या वेळी भाजप पनवेल शहर मंडळाचे दक्षिण भारतीय सेल संयोजक तारानाथ शेट्टी उपस्थित होते.

# फुंडे हायस्कूलमध्ये शनिवार माझ्या आवडीचा उपक्रम

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर विद्यालय येथे 'शनिवार माझ्या आवडीचा' हा एक नाविन्यपूर्ण सहशालेय उपक्रम राबविण्यात येत आहे. पहिलाच शनिवारी (दि. १६) राबविण्यात आला.

बिन भिंतींची शाळा, दप्तरावीन शाळा आणि मनोरंजनातून शिक्षण हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य आहे. इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी, छोट्या छोट्या मनोरंजनात्मक उपक्रमातून ज्ञान घेता यावं या उद्देशाने विद्यालयाचे प्राचार्य एम. जी. म्हात्रे यांनी या उपक्रमाची



योजना आखली. सर्व पालकांची सहविचार सभा घेऊन पालकांच्या संमतीने या उपक्रमाची सुरुवात केली आणि या पहिल्याच शनिवारी उपक्रम यशस्वी होताना दिसून आला.

पहिला शनिवार दर्शना माळी आणि सीमा माळी या दोन उपशिक्षिका यांनी योग्य नियोजन करून यशस्वीरित्या हा उपक्रम राबविला. सुरुवातीला सर्व विद्यार्थ्यांची मास पिटी व त्याअंतर्गत कवायत प्रकार घेण्यात आले. त्यानंतर इंग्रजी शब्द खेळ म्हणून वर्ड रेस घेण्यात आली. सर्व मुलांनी यात आनंदाने सहभाग घेऊन शब्द निर्मितीचा आनंद घेतला. त्यानंतर शाळेतील बागेत निसर्गाच्या सानिध्यात सर्व विद्यार्थ्यांनी एकत्रित सहभोजन केले.

या वेळी विद्यालयाचे प्राचार्य एम. जी. म्हात्रे, चेअरमन कृष्णाजी कडू, पर्यवेक्षक एस. जी. म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख व्ही. के. कुटे आणि इतर सर्व सहकारी शिक्षकसुद्धा या सहभोजनात सहभागी झाले होते. त्यानंतर रंगकाम हा उपक्रम घेण्यात आला. विद्यार्थ्यांनी घरून आणलेल्या मातीच्या पणत्या आणि त्याला स्वतः केलेलं रंगकाम, त्याची सजावट यामध्ये ते अगदी मनःपूर्वक तल्लीन झाले होते. या सर्व उपक्रमातून सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना बक्षीस देऊन त्यांचं कौतुक करण्यात आले. आणि अशाप्रकारे खऱ्या अर्थाने इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांचा हा शनिवार आवडीचा झाला.

सर्व पालकांनी या उपक्रमाचे कौतुक केले. फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर विद्यालयात यापुढेही प्रत्येक शनिवारी हा उपक्रम विविध मनोरंजनात्मक व शैक्षणिक खेळातून राबविला जाणार आहे.

## वीरशैव लिंगायत समाजाचा वधू–वर पालक परिचय मेळावा

**उरण : बातमीदार**

गळ्यात इष्टलिंग, कपाळाला भस्म व भगवान शिवाला आराध्य दैवत मानणारा, शैव संस्कृतीचे आचरण, पालन करणाऱ्या वीरशैव लिंगायत समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र वीरशैव सभा ठाणे जिल्हा व वीरशैव लिंगायत सेवा संस्था ठाणे या सामाजिक संस्था कार्यरत असून या दोन्ही संस्थेच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. २४) सकाळी १०:३० वाजता नानासाहेब धर्माधिकारी सभागृह, ठाकुर्ली (पु.) डोंबिवली (ठाकुर्ली रेल्वे स्टेशन पासून दोन मिनिटांच्या अंतरावर )येथे वीरशैव लिंगायत धर्मातील सर्व जाती पोट जातीतील इच्छुक वधू वर व पालक परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाचे वधू वर मेळाव्याचे ३४ वे वर्ष आहे.

इच्छुक वधू वरांनी नाव नोंदणीसाठी व अधिक माहितीसाठी अध्यक्ष शांतकुमार लच्याने (७७१९८२२९९४), कार्याध्यक्ष प्रदीप निलाखे (९०२९२४८७१३), उपाध्यक्ष बसवंतराव अळगी (९६६४१४२४१२), उपाध्यक्ष शिवानंद संकपाळ (८३५६००७१२५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## संपादकीय

# विकासविरोधी ‘मविआ’

स्वतः काही विधायक काम करायचे नाही आणि दुसरे कोण करीत असेल तर मात्र त्यात खोडा घालून जनतेची दिशाभूल करायची असा कार्यक्रम सध्या ठाकरे गटासह महाविकास आघाडीचा सुरू आहे. धारावी पुनर्विकासाला विरोध दर्शवित मोर्चा काढून ठाकरे गटाचे प्रमुख व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी ते पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. शिवाय प्रत्येक वेळी विरोध करून आघाडी संबंधित नागरिकांचे नाहक नुकसान करीत असल्याचेही वेळोवेळी समोर येत आहे.

**आशियातील सर्वांत मोठी झोपडपट्टी अशी ओळख असलेल्या धारावीचा चेहरामोहरा बदलून तेथील लोकांना चांगली घरे उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने धारावी पुनर्विकास प्रकल्प हाती घेतला आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेली संपूर्ण मुंबईनगरी झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजना हाती घेण्यात आली. त्यातूनच सुमारे ६०० एकरावर वसलेल्या धारावीचा पुनर्विकास करण्याची संकल्पना पुढे आली. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण १९९५मध्ये कार्यान्वित झाले. त्या अंतर्गत हा पुनर्विकास करण्याचा निर्णय घेण्यात आला. २००४मध्ये खऱ्या अर्थाने हा प्रकल्प कागदावर आला. त्याबाबतची अधिसूचना काढण्यात आली. धारावीत साधारणपणे दहा लाख लोक राहतात. ही झोपडपट्टी असली तरी ते एक व्यावसायिक केंद्रही आहे. मोठ्या संख्येने छोटे-मोठे व्यवसाय धारावीत असून हजारो हातांना यातून रोजगार मिळतो. झोपडपट्टी अशी ओळख पुसून आंतरराष्ट्रीय स्तरावर धारावीचा विकास करण्यासाठी पुनर्विकास प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. डीआरपीने विविध कारणस्तव तीनदा निविदा रद्द केल्यानंतर २०२२मध्ये चौथ्यांदा निविदा काढली. त्याला व्यवस्थित प्रतिसाद मिळाला. जेव्हा निविदा खुल्या करण्यात आल्या तेव्हा तीन बड्या कंपन्यांमध्ये अदानी समूह सरस ठरला. सर्वाधिक बोली लावणारी अदानी समुहाची निविदा पात्र ठरली. मग राज्य सरकारने औपचारिक प्रक्रियेद्वारे अदानी समुहाची कंत्राटदार म्हणून नियुक्ती करण्यास मान्यता दिली. विशेष म्हणजे आता अदानी उद्योग समुहाकडून होत असलेल्या धारावीच्या पुनर्विकास प्रकल्पाविरोधात ठाकरे गट विरोध करीत असताना या प्रकल्पाच्या अटी महाविकास आघाडी सरकारच्या काळातील आहेत, असा खुलासा अदानी समुहाने केला आहे. उद्धव ठाकरे व महाविकास आघाडीच्या मोर्चा, सभेनंतर अदानी समुहाने एक पत्रक जारी करीत निविदा प्रक्रियेनंतर अटींमध्ये समुहाने कुठलाही बदल केला नाही. निविदेतील अटी आणि कायद्यानुसारच ‘टीडीआर’चे पालन केलेले आहे. त्यामुळे समुहाला कुठलाही लाभ झाल्याचा दावा करणे चुकीचे आहे, असे म्हटले आहे तसेच पात्र सदनिकाधारांना मुंबईतील ‘एसआरए’पेक्षा १७ टक्के अधिक क्षेत्रफळ मिळेल, असे स्पष्ट केले आहे. अदानींच्या या खुलाशानंतर उद्धव ठाकरे व त्यांच्या सहकारी पक्षांची दुटप्पी भूमिका उघड झाली आहे. केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी तर यावर आपले म्हणणे मांडताना जेव्हा अडीच वर्षे महाविकास आघाडीचे सरकार राज्यात सत्तेवर होते आणि उद्धव ठाकरे मुख्यमंत्रीपदी विराजमान होते तेव्हा त्यांनी धारावीकरांना पाचशे चौरस फुटांचे घर का नाही दिले, असा रोकडा सवाल केला आहे आणि तो रास्त आहे. जेव्हा शक्य असेल तेव्हा काही करायचे नाही आणि नंतर मात्र बोंबलत बसायचे हेच उद्योग ठाकरे गटासह महाविकास आघाडीचे सुरू आहेत. सोन्याचे अंडे देणारी मुंबई महापालिकेची आगामी निवडणूक पाहता हे सारे स्टंट आहेत, मात्र जनता सुज्ञ आहे. ती योग्य वेळी जागा दाखवेल.**

# चोऱ्या टाळण्यासाठी हवी नागरिकांची मदत





**खबरबात**
विजय मांडे

कर्जत तालुक्यात विशेषतः शहरी भागात सातत्याने चोरीच्या घटना घडत आहेत. मग ती दुकान फोडी असो, मंगळसूत्र खेचून नेणे असो, घरफोडी असो किंवा जनावरांची चोरी असो या घटना वारंवार होतच असतात. कर्जत आणि नेरळ पोलिस ठाण्यात मनुष्यबळ कमी आहे. त्यामुळे नागरिकांच्या मदतीशिवाय चोरीच्या घटनांना आळा बसणार नाही. हे कटू सत्य आहे.

९०च्या दशकाच्या मध्यंतरी चोरीच्या घटना वाढल्या होत्या. त्या वेळी ग्रामस्थांनी गस्त घालण्यास सुरुवात केली होती. प्रत्येक गावात ग्रामस्थांची गस्ती पथके होती. पोलीस ठाण्यांकडून 'पोलीस मित्र'अशी ओळखपत्र गस्त घालणाऱ्यांना देण्यात आली होती. आता तर लोकसंख्या दुप्पट-तिप्पट झाली आहे. कर्जत ग्रुप ग्रामपंचायत असताना म्हणावा तितका विकास त्या वेळी झाला नव्हता. २००६मध्ये पेज नदीच्या पाण्यावर कर्जत वाढीव पाणीपुरवठा योजना सुरू झाली आणि बघता बघता कर्जतचा विकास झपाट्याने होऊ लागला. त्यामुळे चोऱ्याही वाढल्या आहेत. कर्जत हे महत्त्वाचे रेल्वेस्थानक असल्याने अगदी रात्रभर प्रवासी सेवा सुरू असते. त्यामुळे विविध भागातील नागरिकांची ये-जा सुरू असते. यामुळे चोऱ्याही वाढल्या आहेत.

१९९२ साली कडावमध्ये मोठा दरोडापडला होता. त्या वेळी श्री बाल दिगंबर देवस्थानचे अध्यक्ष भालचंद्र तथा भाऊ उपाध्ये आणि कडवमधील मोठे व्यापारी शंकर भोपतराव यांच्या घरावर एकाच रात्रीत घरातील पुरुषांवर हल्ला करून त्यांना गंभीररित्या जखमी करून लाखोंचा ऐवज दरोडेखोरांनी चोरून नेला होता. त्या दरोडेखोरांचा तपास अद्यापही लागलेला नाही.

घरात कुणी नसताना घरफोडी करण्याचे प्रमाण जास्त आहे. रात्रीच्या वेळी दुकानांचे शटर कटावणीने किंवा जॅकने उचकटून चोरी करण्याचे प्रकार होत असतात. दुकान फोडल्यानंतर जास्त ऐवज जात नाही. सुटी नाणी किंवा किरकोळ रकमेची चोरी होते, मात्र तुटलेले शटर दुरुस्त करण्यासाठीचा खर्च चोरीच्या रकमेपेक्षा अधिक येतो. या चोऱ्या सीसीटीव्ही कॅमेरात कैद होत असतात, मात्र त्याचा तपास कधीच पूर्ण होत नाही. कत्तलीसाठी चोरून नेणाऱ्या जनावरांच्या घटना सर्रास घडत आहेत. अनेक वेळा विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांनी किंवा पशुप्रेमींनी या चोरांना पकडून पोलिसांच्या हवाली केले आहे. या चोऱ्या पकडल्यामुळे माहीत झाल्या, परंतु अशा किती तरी जनावरांना कत्तल खान्यात नेण्यात येते याची निश्चितच गणती नसावी.

कोतवाल नगरमध्ये राहणारे नरेंद्र झुंजारराव यांच्या घरात सन १९९५-९६मध्ये मध्यरात्रीच्या सुमारास सहा-सात जण दरोडा टाकण्याच्या इराद्याने शिरले. त्या वेळी झुंजारराव यांच्या पत्नी व अतुल, अजय, आशिष असे सर्व कुटुंबीय घरी होते. नरेंद्र यांना काही तरी गडबड असल्याचे लक्षात आले. त्यामुळे ते उठले व बाहेर आले. तितक्यात एकाने चॉपरने त्यांच्या डोक्यावर घाव घातला ते रक्तबंबाळ होऊन खाली पडले, तसेच चोरट्यांनी अजय व आशिषलासुद्धा मारहाण करून जखमी केले. त्याच वेळी त्या इमारतीतील असिफ मिर्झा, राजन पतंगे, वसंत सकपाळ हे रहिवाशी आपली दारे उघडून बाहेर आले. त्यांनी ते दृश्य बघताच आरडा-ओरडा केल्याने ते दरोडेखोर पळून गेले.

ऑगस्ट २०१८मध्ये एक विचित्र दरोड्याची घटना किरवली कॉलनीत परिसरातील महेंद्र देशमुख यांच्या घरात मध्यरात्री २ वा. च्या सुमारास चोरटे घरात शिरले. ते सात जण होते. त्या वेळी घरातील काही लोक जागे झाले. त्यांनी देशमुख यांच्या पत्नी दीपा यांच्या डोक्यात काहीतरी घातले आणि त्यांच्याकडून लॉकरमधील सोन्याचे दागिने काढून घेतले. त्या चोरांनी त्या सर्वांना एका खोलीत डांबून बांधून ठेवले. त्यांना दमदाटी करून त्यांच्याकडील काही सोन्याचे दागिने व पैसे घेतले. त्याने त्यांचे समाधान झाले नाही. मग त्यांनी बँकेचे एटीएम कार्ड देशमुखांकडून बळजबरीने घेतले व पाच जण तेथे थांबून दोघांना डिकसळ येथील एटीएम केंद्रावर पाठवून पैसे काढून घेतले व कार्ड परत आणून दिले. तब्बल सव्वादोन तास या दरोडेखोरांनी देशमुख कुटुंबियांच्या घरात ठाण मांडले होते. या चोरीचा तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक सुजाता तानवडे यांनी शिताफीने लावला.

गेल्याच महिन्यात कर्जत नगर परिषद हद्दीतील दहिवली विभागातील सुयोग नगर मध्ये राहणारे एक रहिवाशी लंडनला आपल्या मुलाकडे गेले होते. इकडे रात्री चोर त्यांच्या घरात प्रवेश



करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे त्यांना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दिसले. त्यांनी त्यांच्या नातेवाईक व मित्रांना फोन करून ही घटना निदर्शनास आणून दिली आणि कर्जतच्या घरी असलेल्या लँडलाईनवर फोन केला. फोनची रिंग वाजताच चोरांनी चोरी करण्याचे सोडून तेथून काढता पाय घेतला. सुयोग नगरमध्ये गेल्या दोन वर्षात अनेक चोऱ्या झाल्या मात्र एकाही चोरीचा तपास लागला नाही, असे तेथील रहिवाशांचे म्हणणे आहे. अशा अनेक घटना होत आहेत. पोलीस आपले काम करतात, परंतु त्यांनाही मर्यादा आहेत.

काही वर्षांपूर्वी कर्जत शहर पोलीस ठाणे स्वतंत्र केल्यास पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस सहाय्यक पोलीस निरीक्षक, हवालदार व पोलीस कर्मचारी अशी १०० जणांची टीम असेल. त्यामुळे ग्रामीण पोलीस ठाणे स्वतंत्र होईल, परंतु त्याचा निर्णय झाला नाही. तो निर्णय झाल्यास पोलीस ठाण्यात मनुष्यबळ वाढेल व सारे प्रश्न सुटतील. हे खरे असले तरी सध्या नागरिकांनीही गस्ती सुरू केल्या, तर चोऱ्यांच्या घटनांमध्ये निश्चतच घट होईल, असे बोलले जात आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# जीमेलद्वारेही मिळणार ॲमेझॉन अनु फ्लिपकार्टसारख्या सुविधा

ऑनलाइन खरेदी करणे ही सगळ्याच ग्राहकांची पहिली पसंती आहे, पण एखादा सण असेल तर ऑनलाइन ॲप्सवर खरेदी करणाऱ्यांची संख्या खूप मोठ्या प्रमाणात वाढते. अशातच कधी कधी वस्तू डिफॉल्ट, तर काही वस्तू वेळेतसुद्धा ग्राहकांपर्यंत पोहचत नाहीत. ऑनलाईन खरेदीच्या वाढत्या मागणीकडे बघता हे ओझे कमी करण्याकरिता गुगल कंपनी जीमेल वापरकर्त्यांसाठी एक खास फीचर लाँच करते आहे. कंपनी जीमेलद्वारे ऑनलाईन खरेदी करण्याचा अनोखा अनुभव युजर्सना देणार आहे.




गुगलने जीमेल ॲपवर ‘गेट इट बाय डिसेंबर २४’ असे एक फिल्टर यूएसए युजर्ससाठी आणले आहे. हे फीचर खरेदीदारांना योग्य वस्तू ओळखण्यास आणि स्वस्त वस्तू शोधण्यास मदत करणार आहे. हे सर्च फिल्टर मोबाइल आणि डेक्सटॉप या दोन्ही उपकरणांवर उपलब्ध असेल. गूगल कंपनीकडून खरेदी करण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येणारे हे फीचर स्वस्त आणि जलद डिलिव्हरी पर्यायांसह उपलब्ध असेल तसेच जीमेल वापरकर्ते त्यांच्या जवळपासच्या दुकानामध्ये पिकअपसाठी उपलब्ध असलेल्या किंवा डिलिव्हरीसाठी पात्र असलेल्या वस्तू पाहण्यासाठी फिल्टरसुद्धा निवडू शकतात.

जीमेल फिल्टर्समध्ये वापरकर्त्यांना पॅकेज ट्रॅकिंगचा अनुभवदेखील देणार आहे. ऑर्डर केलेल्या वस्तूंच्या महत्त्वाच्या डिलिव्हरी अपडेट्स जीमेलमध्ये दाखवल्या जातील. मोबाइल व डेस्कटॉप दोन्ही डिव्हाइसवर जीमेलवर इनबॉक्समध्ये वैयक्तिक संदेश पाठवला जाईल. त्याव्यतिरिक्त जीमेल पॅकेज ट्रॅकिंग फीचरद्वारे वस्तूच्या डिलिव्हरीसंबंधीच्या तारखेत एखादा बदल होत असेल, तर त्वरित तसे कळवण्यात येईल. युजर्स जीमेलमधील सेटिंग्जद्वारे हे फीचर कधीही इनेबल किंवा डिसेबल करू शकतात.

गूगल कंपनी एक तिसरे आणि महत्त्वाचे फीचरसुद्धा वापरकर्त्यांना देते आहे आणि ते म्हणजे खरेदी केलेली एखादी वस्तू तुम्हाला न आवडल्यास ती परत दुकानात पाठवून देणे. युजर्स जीमेलच्या मदतीने मर्चंट रिटर्न पॉलिसी ॲक्सेसचा वापर करू शकतात. गुगल वापरकर्त्यांना एक लिंक पाठवेल तसेच जीमेलच्या सर्च फिल्टरमध्ये तुम्हाला ९० दिवसांच्या आतमध्ये वस्तू परत करण्याची ऑफरसुद्धा असेल.

# महाराष्ट्राचे कुलदैवत श्री खंडोबाचे नवरात्र

श्रीखंडोबा हे महाराष्ट्राचे कुलदैवत आहे. मुख्यत्वे करून महाराष्ट्र आणि कर्नाटक या राज्यांत खंडोबाची उपासना जास्त केली जाते. खंडोबाचे नवरात्र हे मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदा ते मार्गशीर्ष शुद्ध षष्टी असे सहा दिवस साजरे केले जाते. मार्गशीर्ष शुद्ध षष्टी म्हणजेच चंपाषष्टी. या दिवशी खंडोबा ऋषींच्या विनंतीला मान देऊन मणी-मल्लाचा वध करून लिंगद्वय रूपाने प्रगट झाले. नवरात्राचे पांच दिवस उपवास करून सहाव्या दिवशी तो सोडतात. सहा दिवस देवापुढे नंदादीप ठेवतात. देवाला बेल, दवणा व झेंडूची फुले फार प्रिय आहेत म्हणून ती वाहतात.

खंडोबाच्या उपासनेत भंडारा फार महत्त्वाचा आहे. भंडारा म्हणजे हळदीची पूड. खंडोबाच्या कुलधर्मासाठी व चंपाषष्टी या दिवशी ठोंबरा (जोंधळे शिजवून त्यात दही व मीठ घालतात), कणकेचा रोडगा, वांग्याचे भरीत, पातीचा कांदा व लसूण हे पदार्थ नैवेद्यांत असतात. देवाला नैवेद्य समर्पण करण्यापूर्वी तळी भरण्याचा विधी असतो.

तळी भरणे म्हणजे एका ताम्हनात विड्याचे पान, पैसा, सुपारी, भंडारा व खोबरे हे पदार्थ ठेवून ते ताम्हण सदानंदाचा येळकोट किंवा येळकोट येळकोट जय मल्हार असे मोठ्याने तीन वेळा म्हणून तीन वेळा उचलतात. नंतर दिवटी व बुधली घेऊन आरती करतात. देवाकडे तोंड करून भंडारा व खोबरे उधळतात व प्रसाद वाटतात.



**निमित्त**

खंडोबाची पाच प्रतिके:

१) लिंग : हे स्वयंभू, अचल अगर घडीव असते. २) तांदळा : ही चल शिळा असून टोकाखाली निमुळती होत जाते. ३) मुखवटे : हे कापडी किंवा पिटली असतात. ४) मूर्ती : या उभ्या, बैठ्या, घोड्यावर कधी धातूच्या किंवा दगडाच्याही आढळतात. ५) टाक : घरांत पूजेसाठी सोन्याच्या पत्र्यावर किंवा चांदीच्या पत्र्यावर बनविलेल्या प्रतिमा.


खंडोबा ही देवता भक्तांची मनोकामना पूर्ण करणारी व नवसास पावणारी आहे. रविवार हा खंडोबाचा दिवस मानण्यात आलेला आहे. सोमवती अमावस्या, चैत्री, श्रावणी व माघी पौर्णिमा, चंपाषष्टी व महाशिवरात्र या दिवसांना विशेष महत्त्व आहे. मल्हारी-मार्तंड हा शिवाचा भैरव अवतार मानला असल्याने रविवारला महत्त्व आले असावे. चैत्र पौर्णिमा हा मार्तंड-भैरवाचा अवतार दिन आहे. श्रावणी पौर्णिमेस मल्हारी व बाणा यांचा विवाह झाला. माघी पौर्णिमा हा म्हाळसेचा जन्मदिवस आहे, तर मार्गशीर्ष शुद्ध षष्टी म्हणजेच चंपाषष्टी या दिवशी खंडोबा, ऋषींच्या विनंतीला मान देऊन मणी-मल्लाचा वध करून लिंगद्वय रूपाने प्रगट झाले.

महाराष्ट्र आणि कर्नाटकांत खंडोबाची १२ प्रसिद्ध स्थाने आहेत. त्यातील महाराष्ट्रात कडे-कऱ्हे पठार जेजुरी, निमगाव, पाली-पेंबर सातारा, नळदुर्ग धाराशीव, शेंगुड अहमदनगर, सातारे छत्रपती संभाजी नगर, माळेगाव तर कर्नाटकात मैलारपूर-पेंबर (बिदर), मंगसूळी (बेळगाव), मैलारलिंग (धारवाड), देवरगुडू (धारवाड), मण्मैलार (बल्ळारी).

खंडोबा हे अनेक कुटुंबे आपले कुलदैवत म्हणून मानतात. खंडोबाला मणि-मल्लाचा वध केला म्हणून मल्लारी (मल्हारी), मैलार, तसेच (म्हाळसा देवीचा पती म्हणून) म्हाळसाकांत, मार्तंडभैरव, किंवा (स्कंद पर्वतावरील खंडा घेऊन दैत्याचा वध करणारा म्हणून) खंडोबा म्हणतात.

स्कंद पर्वतावरील श्रीशंकर आपल्या खड्गासह मल्लासुराचावध करण्यास आला, त्यावेळी खड्गाला खंडा असे नांव पडले. हा श्रीशंकरांचा अवतार खंडामंडित झाला म्हणून त्याला खंडोबा असे म्हणू लागले.

**-साभार वेबदुनिया**



## आरोग्य प्रहर

# बदललेल्या जीवनशैलीमुळे तरुणांना हृदयरोग

काही वर्षांपासून हृदयविकारासंदर्भातील आजारांमध्ये लक्षणीयरीत्या वाढ झाली असून अवघ्या तिशीत तरुणांनाही हृदयविकाराचा त्रास होऊ लागला आहे. बदलती जीवनशैली, अयोग्य आहारपद्धती, वाढता ताणतणाव, मद्यपान, तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन ही प्रमुख कारणे यामागे असल्याचे तज्ज्ञांनी सांगितली. तरुणांनी हृदयविकाराला दूर ठेवण्यासाठी या बाबी टाळण्याचा सल्लाही त्यांनी दिला आहे.



अभिनेता श्रेयस तळपदे याला गुरुवारी हृदयविकाराचा झटका आला होता. त्यानंतर त्याच्यावर रुग्णालयात उपचार करण्यात आले. श्रेयसप्रमाणेच तरुणांमध्ये हृदयविकाराचे प्रमाण वाढत आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार जगभरामध्ये हृदयरोगामुळे दरवर्षी १८ दशलक्ष लोकांचा मृत्यू होतो. अन्य आजाराने होणाऱ्या मृत्यूंच्या तुलनेत हे प्रमाण ३२ टक्के आहे. भारतामध्ये हृदयरोगामुळे मृत्यू होण्याचे प्रमाण हे २७ टक्के असून, ४० ते ६९ वयोगटातील नागरिकांच्या मृत्यूचे प्रमाण ४५ टक्के आहे.

बदललेली जीवनशैली, ताणतणाव, अयोग्य आहार, मद्यपान, तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन, जागरण करणे ही महत्त्वाची कारणे भारतातील हृदयविकाराने वाढत असलेल्या मृत्यूची आहेत, असे हृदयविकारतज्ज्ञ सांगतात.

पाश्चिमात्य देशांचे अनुकरण करणाऱ्या तरुणाईची जीवनशैली बदलली आहे. जागरण, धूम्रपान, मद्यपानासह दुग्धजन्य पदार्थ, केकसारखे पदार्थ खाण्याकडे कल वाढला आहे. यामुळे शरीरातील कॉलेस्ट्रेरॉल वाढून ते हृदयाच्या धमन्यांमध्ये जमा होते. त्यामुळे धमन्यांमधील पडदा कमकुवत होऊन तो फाटल्याने कॉलेस्ट्रॉल रक्ताच्या संपर्कात येऊन रक्ताच्या गाठी तयार होतात. यामुळे हृदयविकाराचा त्रास होत असल्याचे केईएम रुग्णालयातील हृदयविभागाचे प्रमुख व प्राध्यापक डॉ. अजय महाजन यांनी सांगितले.

आपल्या पूर्वजांपासून आपण खात आलेल्या पारंपरिक अन्नपदार्थातील घटकांनुसार आपल्या शरीरातील गुणसूत्रांची साखळी तयार होते. आपण ‘फास्टफूड’मुळे त्या साखळीला हानी पोहोचवत आहोत. त्यामुळे पारंपरिक अन्नपदार्थाचा आहारात समावेश केल्यास हृदयविकाराचे प्रमाण कमी करण्यास मदत होऊ शकते. दररोज नियमित योगासने करणे, ध्यानधारणा, व्यायाम करणे आवश्यक आहे. पुरेशी झोप घेणे, फळे, सकस आहार, पालेभाज्या खाण्यावर भर द्यावा. धूम्रपान, मद्यपान, तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन टाळावे.

# चौक परिसरातील गावांसाठी निधीची कमतरता पडणार नाही

## आमदार महेश बालदी यांचे आश्वासन



चौक : प्रतिनिधी

चौक परिसरातील गावात विकास कामांना निधीची कमतरता पडणार नाही, येथील जनतेने मला दाखविलेला विश्वास सार्थ करण्याचे पवित्र काम मी करीत आहे, असे कृतीशील उदगार उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांनी काढले.

उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांनी स्थानिक विकास निधी, आमदार निधी, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ, आदिवासी आणि दुर्गम भागाचा विकास अशा अनेक माध्यमातून अर्थ संकल्पात तरतूद करून कारोडो रुपयांच्या मंजुर केलेल्या चौक परिसरतील गावांच्या कामांचा शुभारंभ व लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला होता. या वेळी आमदार महेश बालदी बोलत होते.

लोकार्पण कामांची पाहणी करून कामाच्या दर्जा बाबत ग्रामस्थ व लोकप्रतिनिधी यांच्याशी चर्चा केली. कामांचा दर्जा राखल्या बद्दल उपअभियंता राकेश राखाडे यांचे कौतुक केले. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार ते लोधिवली गाव या रस्त्याचा लोकार्पण, राज्य मार्ग ७९ ते हातनोली गाव याचे लोकार्पण, जूना मुंबई पुणे रस्ता ते कलोते गाव या करोडो रुपयांच्या तीन कामांचे लोकार्पण करण्यात आले. खालापूर तालुक्यातील जव्हार-वाडा-मुरबाड-कर्जत-चौक-लोहोप या राज्य मार्गाची किमी.१२४/५०० ते किमी. १२८/०० व किमी.१२८/२०० ते किमी.१३२/०० या दोन्ही टप्प्यांची सुधारणा करणेसाठी निधीची तरतूद करण्यात आली असून आज या कामांचा शुभारंभ करण्यात आला. गेली अनेक वर्षे कोणत्या ना कोणत्या कारणाने नढाळ कुरुंगळे ते आदिवासीवाडी याही रस्त्याला ४०,१९,३९२.०० एवढ्या रकमेची तरतूद केली. तर भिलवले ठाकूरवाडी येथेही श्रीफळ वाढवून शुभारंभ करण्यात आला. वडविहीर बौद्धवाडा येथे सामाजिक सभागृह भूमिपूजन, आडोशी कोयना येथे अंतर्गत रस्ते व गटारे भूमिपूजन तर आंबेवाडी या दुर्गम भागात माथेरानच्या पायथ्याशी असलेल्या हास्याची पट्टी व आंबेवाडी यांना पाणी पुरवठा करणाऱ्या योजनेचे लोकार्पण करण्यात आले.

भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, तालुका मंडळ प्रमुख प्रवीण मोरे, सरपंच रवींद्र कुंभार, सरपंच रितु ठोंबरे, चौक शहर अध्यक्ष गणेश कदम, प्रदीप गोंधळी,सागर देशमुख, गणेश मुकादम, बळीराम ठोंबरे, सरपंच रेश्मा ठोंबरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता प्रशांत राखाडे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ आणि भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कर्जत चारफाटा येथे दिवसभर वाहतूक कोंडी

**कर्जत : प्रतिनिधी**

बांधकाम विभागाच्या अकार्यक्षमतेमुळे कर्जत चारफाटा येथे होणारी वाहतूक कोंडी गेली अनेक वर्षापासून कायम आहे. त्या रस्त्यावर उभी राहिलेली अनधिकृत दुकाने जमीनदोस्त करूनही वाहतूक समस्या सुटत नसल्याचे चित्र आहे. रविवारी दिवसभर या भागात वाहतूक कोंडीला वाहनचालक यांना सामोरे जावे लागले.

चौक – कर्जत – मुरबाड या मार्गावर कर्जत चारफाटा येथे खास करून शनिवार रविवार होणार्या वाहतूक कोंडीने नागरिक हैराण झाले आहेत. दोन वर्षापूर्वी नारीशक्तीने केलेल्या उपोषणाच्या लढ्यामुळे आणि त्यानंतर वारंवार पत्र व्यवहार केल्याने फेब्रुवारी २०२३ मध्ये चारफाटा येथील अनधिकृत दुकानांवर एम.एस.आर.डी.सी. आणि सार्जनिक बांधकाम विभाग यांच्या वतीने कारवाई करून येथील हॉटेल आणि दुकाने जमीनदोस्त करण्यात आली होती, मात्र बरेच महिने ओलांडूनही सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून मोकळ्या झालेल्या मार्गावर डांबरीकरण करून रस्ता उपयोगात आणण्याचे काम झाले नसल्याने अनधिकृत दुकाने उडवूनही समस्या जैसे थे असल्याचे निदर्शनास येत आहे.





कर्जतमध्ये अनेक फार्महाऊस आणि रिसोर्ट असल्याने शनिवार रविवार अनेक पर्यटक कर्जत मध्ये येत असतात. कर्जत चारफाटा येथे चारही दिशेने जाणाऱ्या वाहनांची या ठिकाणी वाहतूक कोंडी होत असून कधी कधी तासभर किंवा त्यापेक्षा जास्त विलंब लागत असतो.

अचानक एखादा रुग्ण पुढील उपचारासाठी नेत असताना रुग्णवाहिकेला मार्ग मिळण्याससुद्धा अडसर निर्माण होतो. त्यावेळी झालेल्या आंदोलनाची दखल घेऊन चारफाटा येथील दुकाने जमीनदोस्त करण्यात आली होती, मात्र शनिवार रविवार होणारी वाहतूक कोंडी आजही जैसे थे आहे. दुकाने जमीनदोस्त करून मोकळा झालेला मार्गावर डांबरीकरण करून रस्ता रुंद होऊ शकतो. यामुळे वाहतूक कोंडीला काहीसा दिलासा मिळू शकतो, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून हा रस्ता बनविण्यात यावा, अशी मागणी नागरिक करीत आहेत.

### या उपाययोजना आवश्यक

**सार्वजनिक बांधकाम विभागाने ही बाब गांभीर्याने घेऊन या जागेत डांबरीकरण केल्यास ठिकाणी होणारी वाहतूक कोंडी तूर्तास थोडी फार तरी सुटेल आणि पोलिसांवर येणारा अतिरिक्त ताण कमी होईल.**

# रोहा अष्टमी येथे विकसित भारत संकल्प यात्रा



**रोहे : प्रतिनिधी**

विकसित भारत संकल्प यात्रा रोहा शहरात आल्यानंतर शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. विकसित भारत संकल्प यात्रा व्हॅनद्वारे स्क्रीनवर देण्यात आली. या वेळी शपथ घेण्यात आली.

या वेळी विकसित भारत संकल्प यात्रेचे नोडल अधिकारी कैलाश शिंदे, रोहा अष्टमी नगर परिषद कार्यालय अधीक्षक विशाल काळे, उदयनाथ ठाकरे, रचना पार्टे, विशाल शिंदे, प्रसाद शिंदे, नारायण पानवकर, पुजा खुळे, मिलन शहा, जयेश भांबरकर, आनंदा बंडगर, मदन शिवचरण, संजय शिंदे, रोशन शिंदे, अमित केमसे, युनियन बँक, बँक ऑफ इंडिया, बॅक ऑफ बडोदा, महा इ सेवा केंद्राचे प्रतिनिधी उपस्थित होते.

विकसित भारत संकल्प या मोहीम अंतर्गत केंद्र सरकारच्या योजना लोकांपर्यंत पोहोचणे त्याची अंमलबजावणी करणे आदी कार्यक्रम रोहा अष्टमी नगरपरीषद हद्दीत घेण्यात आले. विकसित भारत संकल्प व्हॅनद्वारे स्क्रीनवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची चित्रफीत दाखविण्यात आले.

रोहा शहरात विकसीत भारत संकल्प यात्रा रथ आली होती. रोहा शहरातील ज्येष्ठ नागरिक सभागृह समोरील पटांगणात स्क्रीन वर केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. प्रधानमंत्री स्वनिधी यांनी योजना, प्रधानमंत्री उज्वला योजना, आधर योजना, आयुष्यमान भारत, मुद्रा योजना प्रधानमंत्री आवास योजना व अन्य योजनांची माहिती देण्यात आले. या वेळी नागरीकांचे मोफत आधार अपडेट करण्यात आले. याचा लाभ रोहा अष्टमी शहरातील नागरिकांनी घेतला.

# मुरूड तालुक्यात पर्यटकांचा बहर

## स्थानिक हॉटेल व लॉजिंग व्यवसायिकांची मांदियाळी

**मुरुड : प्रतिनिधी**

आज मुरूड समुद्र किनारी असंख्य पर्यटकांनी मोठी गर्दी केली होती. शनिवार व रविवारची सुटीचा आनंद लुटण्यासाठी काशीद व मुरूड समुद्रकिनारी पर्यटकांनी मोठी गर्दी केली होती. काशीद व मुरुड समुद्रकिनारी गाड्यांच्या रांगा लागल्या होत्या. मोठ्या संख्येने पर्यटक येथे हजर होते.

मुंबई, कल्याण, विरार, पुणे व ठाणे या भागातील पर्यटक मोठ्या संख्येने हजर होते. सर्व पर्यटक आपल्या कुटुंबासह येथे आले होते. सर्व पर्यटक समुद्र स्नान घेण्यात मग्न होते. पर्यटकांची संख्या वाढल्याने हॉटेल व लॉजिंग व्यवसायिकांची मांदियाळी दिसून येत होती. पर्यटक आल्याने सर्व घटकाला पैसे मिळून जातात. त्यामुळे हा व्यवसाय अबाधित राहिला असून सर्वांना रोजगार उपलब्ध करून देणारा ठरला आहे. सुप्रसिद्ध जंजिरा किल्ला पहाण्यासाठीसुद्धा पर्यटक मोठ्या संख्येने आले होते. किल्ला पहाण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटक येथे दिसून आले.



जंजिरा किल्ल्यावर जाण्यासाठी राजपुरी नवीन जेटीवरून १३ शिडांच्या बोटी तैनात असतात.या शिडाच्या बोटींमधून पर्यटकांना सुरक्षित किल्ल्यावर नेले जाते.

एका शिडाच्या बोटीवर सहा कर्मचारी कार्यरत असून येणाऱ्या पर्यटकांना किल्ल्यापर्यंत सुरक्षित नेत असतात.

जंजिरा किल्ल्यावर नेण्यासाठी सुमारे दोनशे लोक कार्यरत असल्याने या सर्व लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. त्याच प्रमाणे जंजिरा जल वाहतूक पर्यटनाने – आण करण्याचे काम करीत असल्याने या संस्थेला सुद्धा लाखो रुपयाचा फायदा मिळत असतो. वर्षाला पाच लाख पर्यटक जंजिरा किल्ल्यास भेट देत असल्याने महाराष्ट्र मेरी टाइम बोर्डास एक पर्यटकांच्या मागे लेवीची ठराविक रक्कम वळती करावी लागते त्यामुळे या किल्यापासून मेरी टाइम बोर्डास लाखो रुपयांचा महसूल मिळत असतो. तर पुरातत्व खात्यानेसुद्धा तिकीट आकारणी केल्याने यांनासुद्धा मोठा महसूल मिळत असतो.

जंजिरा किल्ल्याच्या सभोवताली असणारे गॉगल्स विक्रेते,शहाळी, सरबत, टी स्टॉल यांनासुद्धा पर्यटक आल्याने व्यवसायीची उभारी मिळत आहे. जंजिरा किल्ला पहाण्यासाठी आलेला पर्यटक हा मुरुड मध्ये वस्ती करतो त्यामुळे येथील लॉजिंग व हॉटेल व्यवसायिक यांनासुद्धा चांगला व्यवसाय मिळण्यास खूप मोठी मदत होते.

सुरेश कन्नमवार हे पर्यटक कोल्हापूर येथून किल्ला पहाण्यासाठी आले होते त्यांनी सांगितले कि,जर आम्हाला या ठिकाणी वस्ती केली तर तीन वेळचे भोजन,राहण्याची व्यवस्था, बोट खर्च व किल्ला पहाण्यासाठी द्यावे लागणारे तिकीट, वाहतूक खर्च असा एकूण एका कुटुंबास सहा हजार रुपये खर्च होत असतात.

याबाबत मुरुड समुद्र किनारी असणारे गौरी लॉजिंगचे मालक मनोहर बैले यांनी सांगितले की, पर्यटक हे शुक्रवारी येत असतात व रविवारचे दुपारचे भोजन केले की, रवाना होत असतात. साधारणतः दोन दिवसाची वस्ती केल्यामुळे आम्हाला पूर्ण आठवडा भराचा खर्च निघत असतो. पर्यटक येण्यामध्ये सातत्य राहिल्यास खूप चांगला व्यवसाय हा पर्यटकांकडून मिळत असल्याची प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे. पर्यटनावर अवलंबून असणाऱ्या मुरूडला पर्यटक हा घटक खूप महत्त्वाचा झाला आहे.

# नेरळ येथे हमीभाव भात खरेदी केंद्र सुरू

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ येथे भाताची हमी भावाने खरेदी करण्याच्या केंद्राचे उद्‍घाटन करण्यात आले. नेरळ विविध विकास कार्यकारी सोसायटी यांना महाराष्ट्र स्टेट मार्केटिंग फेडरेशनकडून केंद्र देण्यात आले. फेडरेशनकडून भाताची साठवण करण्यासाठी गोणी देण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांची गैरसोय होण्याची शक्यता आहे.



महाराष्ट्र स्टेट को ऑप मार्केटिंग फेडरेशन आणि जिल्हा पणन कार्यालय यांच्याकडून जिल्ह्यात भाताची हमी भावाने खरेदी केली जाते. त्यासाठी आधारभूत भात खरेदी केंद्र नेरळ विविध विकास कार्यकारी सोसायटी यांना देण्यात आला आहे. या केंद्रावर भाताची हमी भावाने खरेदी सुरू करण्यात आली. नेरळ विविध विकास कार्यकारी सोसायटीच्या खांडा येथील गोडाऊनमध्ये भाताची हमी भावाने खरेदी सुरू झाली. त्यासाठी बाळू बाबू हिलाल यांनी आणलेले भाताचे वजन करून हमी भाव भात खरेदी केंद्राची सुरुवात झाली. यावर्षी भाताच्या अ दर्जाच्या घानाला २२०२ रुपये तर साधारण दर्जाच्या २१८३ रुपयांचा भाव निश्चित करण्यात आला आहे. भाताची हमी भावाने विक्री करण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या शेतीचे उतारे, ई–पीक पाहणी उतारा यांच्यासह ऑनलाईन नोंदणी करायची आहे.

नेरळ येथील भाताच्या हमी भावाने खरेदी केंद्राचे उद्घाटन वजन काट्याचे पूजन करून करण्यात आले. त्यावेळी ह. भ. प. शांताराम धुळे यांनी पुष्पहार घालून वजन केले, तर नंतर श्रीफळ वाढवून या केंद्राचे अधिकृत उद्‍घाटन नेरळ विविध विकास कार्यकारी सोसायटीचे अध्यक्ष राजेंद्र विरले यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी कर्जत कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक विष्णू कालेकर, नेरळ सोसायटीचे संचालक वैभव भगत, धोंडू आखाडे, सावळाराम जाधव, शशिकांत मोहिते, नारायण तरे, यशवंत कराळे आदी उपस्थित होते.

या वेळी मोठ्या प्रमाणात शेतकरी उपस्थित होते. सोमवारपासून ऑनलाईन नोंदणी करणाऱ्या शेतकऱ्यांना नोंदणी क्रमांकनुसार आपले भात केंद्रावर आणता येणार आहे.

# पांढरा कांदा जानेवारीमध्ये बाजारपेठेत दाखल

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अलिबाग तालुक्यातील कार्ले येथील पांढऱ्या कांद्याचे प्रगतशील उत्पादक शेतकरी सतिश म्हात्रे यांनी दोन एकर शेतीत लागवड १४ नोव्हेंबर २०२३ रोजी केली आहे तर १५ जानेवारी २०२४ ला पांढरा कांदा बाजार पेठेत विक्रीसाठी येणार आहे.



महत्त्वाचे म्हणजे या वेळी पांढरा कांदा उत्पादन घेण्यासाठी रेन पाईपद्वारे पाणी देण्याची नवीन अत्याधुनिक पध्दत साकारली असून ती यशस्वी झाली आहे.

पांढऱ्या कांद्याच्या लागवडीसाठी व चांगले उत्पादन घेण्यासाठी सन २०२२ पेक्षा २०२३ हवामानाच्या दृष्टीकोनातून बऱ्यापैकी आहे. त्यांनी लगवडीपासून बुरशिनाशक व किटक नाशक अशा दोन फवारण्या मारल्या आहेत. तसेच पांढऱ्या कांद्याची लागवडीपासून कांदा काढणीपर्यंत स्थानिक महिला वर्गाला रोजगार मिळत आहे. तसेच कृषी विभाग अलिबाग व जिल्हा कृषी विभागामार्फत अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळत आहे. तसेच निफाड संशोधन केंद्र नाशिक यांच्याकडून योग्य ती माहिती मिळाली.

महत्त्वाचे म्हणजे गेली अनेक वर्ष अडचणीवर मात करून पांढऱ्या कांद्याचे उत्पादन होत आहे. सन २०२४ या वर्षी पांढऱ्या कांद्याचे उत्पादन चांगल्या प्रकारे मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.


## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ९९/२०२३-२०२४ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | पेण अलिबाग रिजन व नागोठाणे औद्योगिक क्षेत्र पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. जलशुद्धीकरण केंद्र पोयनाड व नागोठणे येथील प्रयोगशाळेसाठी एक कॅलेंडर वर्षाच्या कालावधीसाठी परिचालन व देखरेखीकरीता सेवा पुरविणे. | ₹ २१,९१,४६०.०० |
| २. | रोहा औद्योगिक क्षेत्र पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. सन २०२४ च्या उन्हाळी हंगामात प्रदूषणग्रस्त गावांना टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे. | ₹ २४,८४,०००.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक १८/१२/२०२३ ते दिनांक २६/१२/२०२३ महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी उपरोक्त कामांबाबत दिनांक २०/१२/२०२३ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २१/१२/२०२३ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# वर्षभरात २८ कोटींचे अंमली पदार्थ जप्त

## नवी मुंबई पोलिसांची कामगिरी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई पोलिसांनी वर्षभरात २८ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ विविध कारवायांमध्ये जप्त केले. डिसेंबरमध्ये नवी मुंबई पोलिसांनी रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यात केलेल्या कारवाईमध्ये सहा कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त केले असून हे पदार्थ बनविण्यासाठी कारखाना आणि शेतघर भाड्याने घेऊन हा गैरधंदा सुरू असल्याचे पोलिसांच्या तपासात उजेडात आले आहे.



मागील दोन महिन्यांपासून या टोळीच्या म्होरक्यांना पकडण्यासाठी नवी मुंबई पोलिसांचे पथक काम करत होते. तीन डिसेंबरला केलेल्या कारवाईची माहिती गुरुवारी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील सभागृहात पत्रकार परिषदेत नवी मुंबई पोलीस उपायुक्त अमित काळे यांनी दिली.

पनवेल तालुक्यातील शिरढोण गावाजवळ मुंबई-गोवा महामार्गावर ३ डिसेंबरला संशयित व्यक्ती मेफेड्रॉन (एम.डी.) अंमली पदार्थ विक्रीसाठी येणार असल्याची माहिती नवी मुंबई पोलीस दलातील अंमली पदार्थ विरोधी कक्षाला मिळाली होती. यानंतर पोलिसांनी सापळा रचून या संशयिताला पकडले. या व्यक्तीकडून पोलिसांनी ६१.०९ ग्रॅम एमडी पदार्थ जप्त केला. बाजारात या पदार्थाची किंमत सहा लाख १० हजार ९०० रुपये होती. या व्यक्तीला अटक केल्यानंतर त्याच्याकडून इतर धक्कादायक माहिती पोलिसांना मिळाली.

सध्या बाजारात पुरवठा केला जाणारा अंमली पदार्थ परदेशातून येत नसून त्याची निर्मिती येथेच केली जात असल्याचे समजल्यावर पोलिसांनी अजून तीन जणांना बदलापूर, ठाणे व खालापूर येथून अटक केली. या आरोपींनी दिलेल्या माहितीनूसार खालापूर तालुक्यातील खोपोली येथील ढेकू गावात बंद पडलेला कारखाना भाड्याने घेऊन तसेच खोपोली पाली मार्गावरील उंबरे गाव येथील एक शेतघर भाड्याने घेऊन या एमडी पदार्थाची निर्मिती केली जात असल्याचे तपासात समोर आले.

सुमारे ४५ लाख रुपयांच्या कच्चा मालाने सहा कोटी रुपयांचे अंमली पदार्थ बनविण्यासाठी एकाने समाजमाध्यमांवरुन प्रशिक्षण घेतले. तसेच बाजारातून अंमली पदार्थ बनविण्यासाठी लागणारे घातक रसायने मिळविली. पोलिसांच्या पथकाला याठिकाणी ३३० लिटर रसायनांचा साठा आणि २५ किलो वजनाची पावडर सापडली.

# इन्स्टाग्रामवर आमिष दाखवून २८ लाखांची फसवणूक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

इन्स्टाग्राम आयडी फॉलो करून भरघोस पैसे मिळवा असे आमिष दाखवून नवी मुंबईतील एका व्यक्तीची तब्बल २८ लाख ९० हजार ४०२ रुपयांची फसवणूक केली आहे.




या प्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पोलीस तपास करीत आहेत. मकरंद गुंडरे असे यातील फिर्यादी यांचे नाव आहे. त्यांना २९ ऑक्टोबर रोजी एक फोन आला. फोनवर बोलणाऱ्या व्यक्तीने त्यांना इन्स्ट्राग्रामवर फॉलो लाईक करा, प्रत्येक दोन लाईक किंवा फॉलोला २१० रुपये मिळतील, असे आमिष दाखवले. सुरुवातीला मकरंद यांनी दोन फॉलो करताच त्यांना ४२० रुपये आले.

काही दिवसांनी फोन वरील व्यक्तीने प्रीपेड योजना सांगितली त्यानुसार दोन हजार रुपये भरल्यावर टास्क पूर्ण होताच दोन हजार ८०० रुपये मिळतील, असे आमिष दाखवले म्हणून मकरंद यांनी फोन वरील व्यक्तीने दिलेल्या बँक खात्यावर २ हजार रुपये भरले. अशाच प्रकारे अनेकदा पैसे भरण्यास सांगून पैशांचा परतावा आणि फॉलो करण्याचे पैसेही देण्यात आले.

दरम्यान, त्यांना पैसे विविध बँक खात्यावर भरण्यास भाग पाडण्यात आले, मात्र परतावा मिळत असल्याने मकरंद हे पैसे भरत गेले. एक वेळेस तर २६ हजार ८०० रुपये त्यांना मिळाले. नंतर एक लिंक पाठवून त्याद्वारे रक्कम भरण्यास सांगण्यात आले. मात्र नंतर परतावा मिळाला नाही. वारंवार मागणी केल्यानंतर संपर्क तोडण्यात आला. त्यामुळे फसवणूक झाल्याचे मकरंद यांच्या लक्षात आले आणि मग त्यांनी सायबर पोलिसांत धाव घेतली.

# 'विद्याभवन'ने पटकाविली विविध आंतरशालेय स्पर्धेत बक्षिसे



**नवी मुंबई : बातमीदार**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलाच्या विद्यार्थ्यांनी आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धांमध्ये आणि बॉक्सिंग क्रीडा प्रकारात अनेक बक्षिसे मिळवली.

कुलगुरू दादासाहेब केतकर आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत दीक्षा बापू आहेर (इयत्ता अकरावी) आणि श्रावणी रवींद्र भोईर (इयत्ता अकरावी) यांनी अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक पटकावत विद्याभवनला उत्कृष्ट महाविद्यालायची ट्रॉफी मिळाली. आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत अनघा शेळके (इयत्ता नववी) हिने द्वितीय तर वेदांत नामदेव मोरे (इयत्ता दहावी) याने तृतीय क्रमांक पटकावला. मार्शल आर्ट्स फेडरेशन ऑफ इंडियाद्वारे मुलुंड येथे आयोजित केलेल्या कॉर्बेट स्पोर्ट्स फेस्टिवलच्या बॉक्सिंग स्पर्धेत माध्यमिक मराठी विभागाच्या इयत्ता दहावीतील भक्ति संतोष गावडे (इयत्ता दहावी) या विद्यार्थिनीने गोल्ड मेडल मिळवले.

पुणे विद्यार्थी गृह संस्थेचे संचालक राजेंद्र बो-हाडे, दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका राजकुमारी इंदलकर, सुवर्णा मिसाळ, श्रीजा नायर, मनीषा मुळीक, समन्वयक पांडुरंग मुळीक पर्यवेक्षिका शोभा लवटे, अस्मिता सलगर, समन्वयक डी. टी. पिंजारी, यांच्यासह सर्व शिक्षक आणि पालकांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# पडीक जागेचे सुशोभिकरण

**नवी मुंबई : बातमीदार**

सायन-पनवेल महामार्गावर उरण फाटा परिसरातील पडीक जागेचे महानगरपालिकेने सुशोभीकरण करण्यात आले आहे. या ठिकाणी २० फूट उंचीचे शिल्प तयार केले त्यात कारंजेदेखील बसवण्यात आले आहे. त्यामुळे परिसर उठून दिसत असून, परिसराला नवी झळाळी प्राप्त झाले आहे. तसेच आकर्षक प्रकाश योजनेने परिसर अधिक खुलून दिसत असल्याने नागरिकांनीदेखील याबाबत आनंद व्यक्त केला.

स्वच्छता अभियानानिमित्त महापालिकेने शहरातील पडीक जागा, चौकी व इतर ठिकाणांचे सुशोभीकरण करण्यास सुरुवात केली आहे. आवश्यक त्या ठिकाणी शिल्प बसविली जात आहेत. उरण फाटा परिसरामध्ये पडीक जागेवर मोठ्या प्रमाणात कचरा पडू लागला होता. पावसाळ्यात गवत वाढत होते. हा परिसर बकाल झाला होता. याबाबत अखेर पालिकेने या पडीक जागेला सुंदर रूप प्राप्त करून दिले आहे. माजी सभागृह नेते रवींद्र इथापे यांनी या पडीक जागेच्या स्वच्छ्तेची मागणी केली होती. अखेर हे शिल्प उभारून जागेचे रुपडे पालटले आहे.

या शिल्पाच्या उद्घाटनावेळी रवींद्र इथापेंसह सुरेश शेट्टी, सुरेश इथापे, प्रदीप गवस, कुणाल महाडिक, रवींद्र हांडे, रंगराव पाटील आदी उपस्थित होते.



# सरदार पटेल यांची पुण्यतिथी

**नवी मुंबई : बातमीदार**

अपना दल (एस) नवी मुंबईच्या वतीने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या ७३व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित करण्यात आली होती.

बेलापूर कार्यालयात आयोजित कार्यक्रमात बोलताना अपना दलचे महाराष्ट्र राज्य प्रभारी महेंद्र वर्मा म्हणाले की, भारताचे एकत्रिकरण करून अखंड भारत निर्माण करण्यात लोहपुरुष सरदार पटेल यांचे योगदान दुर्लक्षित करता येणार नाही. स्वातंत्र्यानंतर त्यांनी कोणत्याही युद्धाशिवाय ५६२ लहान-मोठ्या संस्थानांचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण करून अखंड भारत निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. अन्यथा आज देशाचे अनेक तुकडे झाले असते.




वर्मा पुढे म्हणाले की, आज आपण भारताला स्वतंत्र भौगोलिक अस्तित्व म्हणून ओळखतो हे सरदार पटेलांचे योगदान आहे. ते म्हणाले की, सरदार पटेल हे एकमेव निर्णायक व्यक्ती होते ज्यांनी भारतीय नागरी सेवेचे सातत्य राखले.

या वेळी अपना दल, नवी मुंबई अध्यक्ष आशिष गोस्वामी, जनकल्याण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष राजेश शर्मा, घर हक्क संघर्ष समितीचे कोषाध्यक्ष कैलास सरकटे, जे.पी.शर्मा यांनीही मनोगत व्यक्त केले.

या समारंभात अधिवक्ता विलास अहिरे, ज्येष्ठ समाजसेवक जितेंद्र कटियार, हरिहर वागल, विपिन तिवारी, पत्रकार रामप्रीत राय, जनकल्याण सामाजिक संस्थेचे उपाध्यक्ष उमेश शर्मा, सरचिटणीस सुरेंद्र सरोज यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# नवी मुंबई पालिकेच्या पाककला, रांगोळी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका अधिकारी, कर्मचारी वृंदामध्ये दडलेल्या सुप्त गुणांना वाव मिळण्याच्या दृष्टीने महापालिकेच्या १ जानेवारी २०२४ रोजी होणाऱ्या ३२व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून विविध स्पर्धा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये महिला कर्मचाऱ्यांना विशेष सहभाग घेता यावा याकरिता पाककला व रांगोळी स्पर्धेचे नवी मुंबई महापालिका मुख्यालयात आयोजन करण्यात आले होते.



या वेळी अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले व विजयकुमार म्हसाळ, शहर अभियंता संजय देसाई, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, क्रीडा विभागाच्या उपआयुक्त ललिता बाबर, भांडार विभागाच्या उपायुक्त मंगला माळवे, महापालिका सचिव चित्रा बाविस्कर, अतिरिक्त शहर अभियंता शिरीष आरदवाड, शिक्षणाधिकारी अरुणा यादव यांनी उपस्थित राहून सहभागी महिला स्पर्धकांना प्रोत्साहीत केले.

अत्यंत उत्साहात झालेल्या पाककला स्पर्धेमध्ये २३ तसेच रांगोळी स्पर्धेमध्ये १७ अधिकारी, कर्मचारी महिलांनी सहभागी होत स्पर्धा उपक्रम यशस्वी केले.

पाककला स्पर्धेकरीता या आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षानिमित्त पौष्टिक तृणधान्यापासून बनविण्यात आलेले पदार्थ हा विषय देण्यात आला होता. २३ महिला कर्मचाऱ्यांनी बनविलेल्या व आकर्षक रितीने मांडून ठेवलेल्या पदार्थांच्या डिशेशचे परीक्षण भारती विद्यापीठ हॉटेल मॅनजमेंट विभागाचे प्राध्यापक आदित्य जोशी व हर्षल अठनीकर यांनी केले.

रांगोळी स्पर्धेमध्ये १७ महिला कर्मचाऱ्यांनी सुरेख रांगोळ्या रेखून त्यासोबत प्रबोधनात्मक संदेशही प्रसारीत केले. सुप्रसिध्द रंगावलीकार श्रीहरी पवळे यांनी या स्पर्धेचे परीक्षण केले.

# 'लायन्स'तर्फे एन. आय. हायस्कूलमध्ये डिजिटल अभ्यासक्रम सेट

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

लायन्स क्लबचे उपाध्यक्ष लायन ज्ञानेश्वर कोठावदे यांच्या प्रयत्नांनी ओएनजीसी या कंपनीच्या सीएसआर फंडातून एन. आय. हायस्कूल उरण या मराठी माध्यमाच्या शाळेमध्ये शिशु वर्ग ते इयत्ता बारावी या सर्व वर्गातील विद्यार्थ्यांना ऑडिओ विस्युअल या अत्याधुनिक शिक्षण पद्धतीने शिक्षण देण्यासाठी १५ टीव्ही आणि प्रत्येक वर्गाचा डिजिटल अभ्यासक्रम सेट देण्यात आला. यासाठी ओम इन्फोटेकचे निलेश साळुंखे यांचे अनमोल सहकार्य लाभले.




जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट दादर या संस्थेची एन. आय. हायस्कूल, उरण ही उरण तालुक्यातील तळागाळातील जनसामान्य विद्यार्थ्यांना शिक्षण देणारी १०१ वर्षांची उरणमधील सर्वात जुनी शाळा आहे. १४५० गरीब गरजू विद्यार्थ्यांना याचा उपयोग होणार आहे. लायन्स क्लबच्या अध्यक्ष निलिमा नारखेडे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कोठावदे, खजिनदार नरेंद्र ठाकूर, सदानंद गायकवाड, सतिश गाडे, एल एम भोये. एन. आय. हायस्कूलचे मुख्याध्यापक, शिक्षक यांच्या उपस्थितीत कार्यक्रम झाला.

# १५०० कापडी पिशव्यांचे मोफत वाटप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट व प्रासोल केमिकल लिमिटेड यांच्यावतीने पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील माजगाव आंबिवली येथे कापडी बॅग वाटप कार्यक्रम रविवारी (दि. १७) करण्यात आला.



पर्यावरण वाचविण्यासाठी प्लास्टिक बंदी जनजागृती करून कापडी बॅग वापरण्यावर नागरिकांची पसंती कायम राहावी या हेतूने पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट अध्यक्ष अरुण गोविंद जाधव यांच्यावतीने प्लास्टिक हटाव हा संदेश देत कापडी बॅग वाटप करण्यात आले. शिवसेना शाखा आंबिवली यांच्यातर्फे मंगेश पाटील व प्रदीप जाधव यांनी भैरवनाथ मंदिर आंबिवली येते लायन्स क्लब ऑफ शहापूर व जितेंद्र भन्साळी नेत्र रुग्णालय शहापूर यांच्या मध्यामातून नेत्र तपासणी व मोफत मोतीबिंदू ऑपरेशन ठेवण्यात आले होते. या वेळीही कापडी बॅग वाटप करण्यात आल्या.

प्रमुख पाहुणे म्हणून जयवंत पाटील उपसभापती कृषी उत्पन्न बाजार समिती खालापूर, माजगावचे उपसरपंच राजेश पाटील, प्रांजल प्रदीप जाधव, ग्रामपंचायत सदस्य निलेश जाधव, नियती इंटरप्राईजेस संदीप शिवाजी जाधव, विलास कांबळे, अविनाश कांबळे, रमेश जाधव माजी सदस्य ग्रामपंचायत, अशोक जाधव, रमेश जाधव, अनंत लभडे, राजेश पाटील, चंद्रकांत जाधव आदी उपस्थित होते.

# नेरूळच्या सोसायटीमधील विद्युत केबिन जळून खाक

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरुळ सेक्टर १९ ए मधील भीमाशंकर को ऑप हौसिंग सोसायटीमधील विद्युत मीटर केबिनला शॉर्ट सर्किटमुळे शनिवारी दुपारी भीषण आग लागली. या आगीत केबिन जळून खाक झाली. सुदैवाने या आगीत कोणीही जखमी झाले नाही. नेरूळ अग्नीशमन दलान तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन आग विझवली.

नेरूळ फेज १ येथील भीमाशंकर हाऊसिंग सोसायटीत असणार्या विद्युत मीटर केबिनला अचानक शॉर्ट सर्किटमुळे आग लागली. काही क्षणातच आगीने रौद्र रूप धारण केले. या आगीत संपूर्ण केबिन जळून भस्मसात झाली. ही आग दुपारी बाराच्या सुमारास लागताच तात्काळ नेरूळ अग्नीशमनला बोलण्यात आले. सुमारे तासाभराने आग आटोक्यात आली.

या प्रकरणी नेरुळ पोलीस ठाणे पुढील तपास करीत आहे. सुदैवाने आगीत कोणीही जखमी झाले नाही वा मोठी वित्त हानी झाली नाही.

# देऊळवाडी येथे दत्तजयंती

**उरण : बातमीदार**

रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील उरण शहरामध्ये देऊळवाडी येथे श्री दत्त मंदिर हे जागृत देवस्थान आहे. हिंदू धर्मात महत्वाच्या देवतेपैकी भगवान श्री दत्तात्रेय हे अनेक पंथाचे, अनेक उपासकांचे आराध्य दैवत आहे. त्यामुळे हिंदू धर्मात दत्त उपासनेला अनन्य साधारण महत्व आहे. त्यामुळे अनेक विविध जिल्ह्यातून भाविक भक्त नेहमी श्री दत्त मंदिर देऊळवाडी, उरण शहर येथे दर्शनासाठी नेहमी येत असतात.



मंदिराची तसेच मूर्तीची स्थापना होऊन ९७ वर्षे पूर्ण झाली असून श्री दत्त मंदिराची सुवर्ण महोत्सवाकडे वाटचाल सुरू आहे. दरवर्षी दत्त जयंतीनिमित्त उरण मध्ये खूप मोठी यात्रा भरत असते. यंदा मंगळवारी (दि. २६) दत्तजयंती असल्याने दत्त जयंतीचे औचित्य साधून देऊळवाडी येथील श्री दत्त मंदीरात पहाटे ३ वाजता श्रीचा अभिषेक, दुपारी १२ वाजता श्रींची आरती व नैवेदय, रात्री ९ वाजता श्रीचा पालखी सोहळा असे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मंदिराचे पुजारी ओमकार बैरागी यांनी दिली.

दरवर्षी देऊळवाडी यूवक मंडळ व देऊळवाडी ग्रामस्थ मंडळातर्फे भाविभक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. यंदाही भाविक भक्तांसाठी श्री दत्त मंदिर, देऊळवाडी येथे दुपारी १२ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून भाविक भक्तांनी देवदर्शन घेउन महाप्रसादाचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहन देऊळवाडी युवक मंडळ व देऊळवाडी ग्रामस्थ मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.


## निवडक

### अलिबागमध्ये भारत संकल्प यात्रा



**अलिबाग** : नगर परिषदेतर्फे शहरात विकसित भारत संकल्प यात्राचे आयोजन करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनकल्याणाच्या योजना आणल्या आहेत. त्याबद्दल माहिती देण्यात आली. तत्काळ त्या योजना जनतेपर्यंत पोहचविण्याचे काम करणयात आले. उद्घाटनावेळी मुख्याधिकारी अंगाई साळुंखे, भाजप दक्षिण रायगड सरचिटणीस अ‍ॅड. महेश मोहिते, अ‍ॅड. अंकित बंगेरा, कुर्डुसचे सरपंच अनंत पाटील, देवेन सोनवणे, पारस मोता, अशोक वारगे, भक्ती वारगे, भाजप अलिबाग पदाधिकारी व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### रोह्यात अमृतधारा गोशाळेचे उद्घाटन



**रोहे** : तालुक्यातील सुतारवाडी परिसरातील धगडवाडी येथे माँ प्रतिष्ठानच्या वतीने अमृतधारा गोशाळेचे उद्घाटन श्रीमद् जगद्गुरु शंकराचार्य राघवेश्वर भारती महास्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. माँ प्रतिष्ठानचे कृष्णा भट यांनी शंकराचार्य राघवेश्वर भारती महास्वामी यांचे जोरदार स्वागत केले. कृष्णा भट हे गेली १५ ते २० वर्षे ढोकळेवाडी येथे गोशाळा चालवीत आहेत. गेले दोन दिवस मोठ्या उत्साहात कार्यक्रम झाला.

### श्रीगांव येथे आयुष्यमान भारत कार्डवाटप



**पाली** : श्रीगांव येथे सक्षम सामाजिक संस्थेतर्फे भाजपचे दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर यांचे सहकारी विवेक तेंडुलकर यांच्या अध्यक्षतेखाली दिनेश राऊत यांच्या उपस्थितीत आयुष्यमान भारत कार्डचे मोफत वाटप करण्यात आले. प्रथम दिलीप भोईर यांच्या मातोश्री स्व. रुख्मिणी विठ्ठल भोईर व श्रीगांव येथील स्व. पोशीबाई जुईकर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. १५० जणांना आभा कार्ड देण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष लहू म्हात्रे, सचिव कमळाकर पाटील, उपसचिव डॉ. शंकर शितोळे, अलिबाग तालुका महिला संघटक जितेश्री पाटील, खजिनदार काशिनाथ पाटील, उपखजिनदार बबन पिंगळे, सदस्य मनोज पाटील, प्रभाकर घरत, दत्तात्रेय पाटील, सदस्य प्रणाली राऊत, सल्लागार अ‍ॅड. दामोदर पाटील यांसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# महावाचन चळवळ उपक्रम उपयुक्त –मंत्री उदय सामंत

## माणगावात शुभारंभ; वाचन संस्कृतीला मिळणार प्रोत्साहन

**माणगाव : प्रतिनिधी**

वाचन हे महत्त्वाचे मूलभूत कौशल्य असून वाचन जाणीवपूर्वक शिकले पाहिजे. आनंददायी वाचनाला प्रोत्साहन देण्यासाठी महावाचन चळवळ उपक्रम उपयुक्त ठरणार असल्याचे प्रतिपादन उद्योगमंत्री तथा पालकमंत्री उदय सामंत यांनी केले.

शासन आपल्या दारी या अभियानानिमित्त माणगाव तालुक्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापाठ लोणेरे येथील सभागृहात आयोजित आढावा बैठकीनंतर पालकमंत्री उदय सामंत आणि महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते महावाचन चळवळ उपक्रमाचा शुभारंभ शनिवारी (दि. १६)करण्यात आला.



या वेळी आमदार भरत गोगावले, आमदार महेंद्र दळवी, जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बढे, शिक्षणाधिकारी पुनिता गुरव यांसह विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

या कार्यक्रमाद्वारे वाचन चळवळीला महावाचन उत्सव असे संबोधण्यात येईल. यामध्ये प्रत्येक आठवड्यात एक विषय, थीम निश्चित करून त्यावर आधारित पुस्तकांचे शाळामध्ये वाचन करणे, वक्तृत्व स्पर्धा, लेखन स्पर्धा इ. चे आयोजन करण्यात येणार आहे. महावाचन उत्सवासाठी सहा आठवड्यांच्या वाचन, व्हिडीओ, ऑडिओ वा लघुनिबंधासाठी काही मार्गदर्शक विषयाबाबत मार्गदर्शक पुस्तिका उपलब्ध करून देण्यात येईल.

शालेय स्तरावरील उपक्रमामध्ये साप्ताहिक दोन वाचन तासिका समाविष्ट करण्यात येऊन या तासिकांमध्ये वाचनाबाबतचे उपक्रम घेण्यात येतील. गोष्टीचा शनिवार या उपक्रमांतर्गत सर्व शाळांमध्ये दर शनिवारी ई–पुस्तके उपलब्ध करून दिली जातील.

समाजाला या वाचन चळवळीत सामावून घेण्यासाठी, मुलांना चांगल्या दर्जाची पुस्तके उपलब्ध करुन देण्यासाठी सृजनशील कल्पनांना चळवळीत सहभागी करून घेण्यात येणार आहे.

ज्या ग्रामपंचायती आणि स्थानिक स्वराज्य संस्था आपल्या गावातील, शहरातील सर्व मुले इयत्ता तिसरीपर्यंत वाचू शकतात, असे घोषित करतील अशा संस्थांना प्रसिद्धी दिली जाईल, तसेच स्पर्धा घेऊन पुरस्कृत केले जाईल. राज्य, जिल्हा आणि तालुकास्तरीय पुरस्कार देण्यात येणार आहेत.

## मुरूड किनाऱ्यावरील वाहनतळाचे काम सुरू

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड नगर परिषदेच्या विकासकामांसाठी स्थानिक आमदार महेंद्र दळवी यांनी कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्यामुळे मुरुड शहरातील विविध विकास कामे सुरू आहेत. या अंतर्गत समुद्रकिनारी पर्यटकांना वाहने पार्किंगसाठी काँक्रीटीकरणाचे काम प्रगतीपथावर असून लवकरच हे काम पूर्ण होणार आहे



सुमारे २५० वाहने या वाहन तळावर विसावतील असा मोठा प्लॅटफॉर्म येथे तयार होत आहे. तवसाळकर जेट्टी ते विश्रामधामपर्यंतच्या सौंदर्यीकरणसाठी सुमारे ११ कोटी ५० लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत. त्यामुळे हा भाग मोठा विकसित होऊन पर्यटक व स्थानिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. तवसाळकर जेट्टी ते विश्रामधाम या रस्त्यावरच्या बाजूला ४५ टपरीधारक आहेत.

दुसरा टप्पा हा परेश हॉटेल ते गोल्डन स्वान हॉटेल येथील समुद्रकिनारा विकसित करणार आहे. या कामासाठी तीन कोटी ९४ लाख ८५ हजार रुपयांचा निधी खर्च होणार आहे. हे कामसुद्धा सुरू झाले असून लवकरच पूर्णत्वाकडे जाणार आहे.

## जैव वैद्यकीय कचरा आपल्या परिसरात येऊ देणार नाही –आमदार महेश बालदी

**चौक : प्रतिनिधी**

मुंबई महानगरपालिका असो अथवा कोणत्याही प्रकल्पाचा जैव वैद्यकीय कचरा आपल्या परिसरात येऊ देणार नाही, अशी ग्वाही आमदार महेश बालदी यांनी पाताळगंगा परिसरातील बोरिवली व अन्य ग्रामस्थांना दिली.

मुंबई महानगरपालिका यांच्या देवनार डम्पिंग ग्राऊंडवरील जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन करण्यासाठी रायगड जिल्ह्यातील पाताळगंगा औद्योगिक वसाहतीमधील ग्रुप ग्रामपंचायत वडगाव हद्दीतील बोरीवली विभागांत १८ हजार चौ. मी. च्या विस्तीर्ण भूखंडावर करण्यास संचालक मंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे, अशी माहिती मिळाल्यावर वडगाव ग्रामसभेत ठराव संमत करून या प्रकल्पाला कडाडून विरोध केला आहे. या विरोधाचे निवेदन संबंधीत अधिकाऱ्यांना दिले असून मुख्यमंत्री, पालकमंत्री यांनाही दिले आहे. हा परिसर उरण विधानसभा मतदारसंघात येत आहे. त्यामुळे



येथील प्रतिनिधींनी आमदार महेश बालदी यांची भेट घेऊन त्यांना सविस्तर माहिती दिली व निवेदनाची प्रत सादर केली आहे.

आपल्या मतदारसंघात स्थानिक जनतेला त्रास होईल, असा प्रकल्प येऊ देणार नाही, असे आश्वासन देऊन उद्याच नागपूर या ठिकाणी पालकमंत्री उदय सामंत यांच्याबरोबर चर्चा करून येत्या काही दिवसांत आपली बैठक आयोजित करण्यात येईल, असे आश्वासन आमदार महेश बालदी यांनी दिले.

## खोपोली ते रायगड पायी पालखी सोहळा

**खोपोली : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांना मानवंदना देण्यासाठी रायगड किल्ला येथे पायी पालखी सोहळ्याचे आयोजन वेध सह्याद्री सामाजिक संघटनेतर्फे करण्यात आले आहे.

शिळफाटा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास मानवंदना देऊन शनिवारी (दि. १६) या पालखी सोहळ्याचा प्रारंभ झाला. या वेळी छत्रपती शिवरायांच्या जयजयकाराने परिसर दणाणून गेला. १६ ते १९ डिसेंबरदरम्यान पायी पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याचे वेध सह्याद्रीचे आकाश घरडे यांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास आजच्या पिढीला कळावे व त्यांनी तो समजून घ्यावा यासाठी या पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसुरकर, सकल मराठा समाजाचे समन्वयक विनोद साबळे, शिवप्रेमी शिळफाटा येथे उपस्थित होते.

खोपोली, पाली, पोलादपूर, पाचाड यामार्गे पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी विविध ठिकाणी पालखी सोहळ्याचा मुक्काम असणार असल्याचे सांगण्यात आले.



## माणगाव पाणसई विभागातील विकासकामांचे भूमिपूजन

**माणगाव : प्रतिनिधी**

निजामपूर विभागाला विकासकामांच्या बाबतीत खासदार सुनील तटकरे यांचे नेहमीच झुकते माप राहिले आहे. निजामपूर विभागाला महायुतीच्या सरकारमध्ये सत्तेत आल्यानंतर १० कोटींची विकासकामे करण्यात यश आल्याचे प्रतिपादन आमदार अनिकेत तटकरे यांनी कालवण येथील कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.

तालुक्यातील पाणसई विभागातील मुठवलीतर्फे निजामपूर येथील अंतर्गत रस्ता व महिला कार्यशाळा तसेच कालवण येथील अंतर्गत रस्ता या कामांचे भूमिपूजन व युवा नेते नितीन जाधव, पाणसई ग्रामपंचायत सदस्य निकिता जाधव, ग्रामपंचायत सदस्य गंगू कोळी व त्यांच्या समर्थकांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये जाहीर प्रवेश कार्यक्रम रविवारी (दि. १७) झाला. या वेळी आमदार अनिकेत तटकरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास महाड विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष बाबूशेठ खानविलकर, निजामपूर विभाग अध्यक्ष संदीप जाधव, इंदापूर विभाग अध्यक्ष काका नवगणे, इंदापूर ग्रामपंचायत सदस्य नितीन घोणे, पाणसई विभाग राष्ट्रवादीचे अध्यक्ष भिकूशेठ धाडवे, पाणसई ग्रामपंचायत सरपंच रुचिता धाडवे, ग्रामपंचायत सदस्य सयाजी मोरे, सदस्य सुनंदा हर्णेकर, ज्येष्ठ नेते बाळाराम सुकुम, मिलिंद खानविलकर, युवा नेते गणेश सुकुम, दीपक सुकुम, सुरेश हर्णेकर, विजय साळवी, काशीराम पाटील, सामाजिक कार्यकर्ते विजय कालवणकर, अजित लाडघरे, रमेश लाडघरे आदींसह कालवण ग्रामस्थ उपस्थित होते.

अध्यक्ष बाबूशेठ खानविलकर म्हणाले की, आजचा पक्षप्रवेश आपल्यासाठी अत्यंत महत्त्वाचा होता. सर्व प्रवेशकर्त्यांचे मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात स्वागत करतो. येणाऱ्या निजामपूर विभागातील नऊ ग्रामपंचायतींच्या निवडणुका राष्ट्रवादी काँग्रेस जिंकून त्यामध्ये पाणसई ग्रामपंचायत ही १ नंबरवर असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पाणसई ग्रामपंचायत सदस्य सयाजी मोरे यांनीही मनोगत व्यक्त केले.



## राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या निवासी शिबिराचा समारोप

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे येथील कोकण एज्युकेशन सोसायटीच्या आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या निवासी शिबिराचा समारोप शनिवारी (दि. १६) झाला.

सात दिवस चाललेल्या या शिबिरात विद्यार्थ्यांनी प्लास्टिकमुक्त भारत या अभियानांतर्गत श्रमदान, स्मशानभूमिची स्वच्छता, तळ्याची स्वच्छता, वनराई बंधारा बांधणे आदी कामे केली. गावातील लोकांचा सहभाग वाढवण्यासाठी 'स्वच्छ घर सुंदर परिसर' या विषयावर रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत एकूण ३० कुटुंबे सहभागी झाली होती.

यातील पहिल्या तीन आकर्षक रांगोळ्यांना बक्षीस देण्यात आले. नेत्रचिकित्सा शिबिराद्वारे १३९ रुग्णांची तपासणी करून काही रुग्णांना मोफत चष्मा वाटप करण्यात आले. श्रमाबरोबरच संस्कार व्हावे या हेतूने योग प्रशिक्षण, स्वच्छ भारत अभियान, महिला सबलीकरण, एचआयव्ही एड्स ही सामाजिक समस्या, वैज्ञानिक दृष्टिकोन व बुवाबाजी प्रयोग, प्रभावी पथनाट्य सादरीकरण इ. विषयावर प्रबोधन सत्र आयोजित करण्यात आली होती, तसेच शिबिराच्या सहाव्या दिवशी रात्री सार्वजनिक ठिकाणी विविध विषयांवर सहभागी विद्यार्थ्यांनी बसवलेल्या विषयावरील पथनाट्य सादरीकरण करण्यात आले. प्राचार्य डॉ. संदेश गुरव, पिगोंडे सरपंच संतोष कोळी, रा. से. यो. जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. तुलसीदास मोकल, सरपंच उपसरपंच रंजना माळी, सदस्य कांचन माळी यांच्यासह वेलशेत आंबेघर ग्रुप ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## आंबा मोहोर संरक्षण करण्याचे शेतकऱ्यांना आवाहन

**मुरूड : प्रतिनिधी**

डिसेंबरमध्ये थंडीचे प्रमाण वाढत असून आंब्याच्या झाडांना पालवी फुटून मोहोर फुटण्याची प्रतीक्षा आहे. मोहोर फुटतांना त्यावर तुडतुडे, कोळी, मिजमाशी, पिठ्या ठेकूण आदी किडी तसेच करपा, भुरी इ.रोगांचा प्रादूर्भाव संभवतो. तो कमी करणे आवश्यक आहे.

ढगाळ वातावरण राहिल्यास अशा रोग व किडींचा प्रादूर्भाव लगेच होतो. मोहोर फुटल्यानंतर जर फवारणी केली तर किडीचे नियंत्रण करणे अवघड जाते.

यासाठी खालीलप्रमाणे फवारणी नियोजन करावे. मोहोराचे संरक्षण करतांना पहिली फवारणी (पोपटी रंगाच्या पालवीवर मोहोर येण्यापूर्वी) डेल्टामेथ्रीन २.८ टक्के, ईसी–०.५ मिली प्रतिलिटर पाणी याप्रमाणे घेऊन फवारणी करावी. दुसरी फवारणी (बांगे फुटताना)–लॅम्बडा सहालोथ्रीन ५ टक्के ईसी ०.५ मिली आधिक हेक्साकोनॅझोल ५ टक्के ईसी १ मिली लिटर पाणी याप्रमाणे घेऊन फवारणी करावी. तिसरी फवारणी (दुसऱ्या फवारणी नंतर १५ दिवसांनी)–इमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के एसएल–२.४ मिली अधिक कार्बेनडीझम १२ टक्के + मॅन्कोझेब ६३ टक्क डब्ल्यू पी–२ ग्रॅम, पाणी याप्रमाणे घेऊन फवारणी करावी, तसेच चौथी फवारणी (तिसऱ्या फवारणी नंतर १५ दिवसांनी) थायोमेथोक्साम २५ टक्के डब्ल्यू जी ०.५ ग्रॅम अधिक झिनेब ६८ टक्के + हेक्साकोनॅझोल ४ टक्के डब्ल्यू पी २ ग्रॅम लिटर पाणी याप्रमाणे घेऊन फवारणी करावी. अशा पद्धतीने व्यवस्थापन केल्यास उत्पादकता तसेच उत्पादनाचा दर्जा सुधारण्यास नियमितपणे मदत होते.

आंबा बागायतदारांनी मोहोर संरक्षण करतांना वरील पद्धतीने फवारण्या कराव्यात, असे आवाहन तालुका कृषि अधिकारी मनिषा भुजबळ यांनी केले आहे.

# टीम इंडियाचा दक्षिण आफ्रिकेवर विजय

## भारत विरूद्ध दक्षिण आफ्रिका वनडे मालिका

**जोहान्सबर्ग : वृत्तसंस्था**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेला रविवारपासून सुरुवात झाली आहे. या मालिकेतील पहिला सामना जोहान्सबर्गच्या न्यू वांडरर्स स्टेडियमवर पार पडला. या सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेचा आठ गडी राखून दणदणीत पराभव केला. या विजयात अर्शदीप-आवेश आणि साई-श्रेयसने मोलाचे योगदान दिले.



भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या वनडे मालिकेत विजयाने सुरुवात केली आहे. आफ्रिकन संघाचा पराभव करीत भारताने मालिकेत १-० अशी महत्त्वपूर्ण आघाडी घेतली आहे. पाच वर्षांनंतर भारताने दक्षिण आफ्रिकेत वनडे जिंकली आहे. टीम इंडियाने शेवटचा २०१८मध्ये सेंच्युरियनच्या मैदानावर विजय मिळवला होता. त्यानंतर २०२२मध्ये सलग तीन सामन्यांत पराभव पत्करावा लागला होता.

पहिल्या सामन्यात वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंग आणि आवेश खान यांनी मिळून दक्षिण आफ्रिकेकडून नऊ विकेट्स घेतल्या. त्यामुळे पहिल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा संघ २७.३ षटकांत अवघ्या ११६ धावांत सर्वबाद झाला. या सामन्यात वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगने एक खास विक्रम आपल्या नावावर केला आहे.

## पालीखुर्द येथे रंगल्या कुस्ती स्पर्धा

# भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जय बापदेव ग्रुप पालीखुर्द यांच्यातर्फे आमदार चषक २०२३ रायगड जिल्हा मर्यादित कुस्ती स्पर्धांचे आयोजन रविवारी (दि. १७) करण्यात आले होते. या कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले.



या वेळी भाजपचे पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, पंचायत समिती माजी सदस्य भूपेंद्र पाटील, जिल्हा परिषद माजी सदस्य सुनील पाटील, नेरे विभागीय अध्यक्ष वैभव पाटील, माजी उपसरपंच संतोष शेळके, भाऊ पाटील, भिंगारवाडी माजी सरपंच योगेश लहाने, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, लोणिवली सरपंच सतीश मालुसरे, उपसरपंच प्रवीण पालव, विचुंबे विभागीय अध्यक्ष महेंद्र भोईर, प्रवीण म्हात्रे, गुरुनाथ भोईर, भगवान पाटील, राजू पाटील, बापू भोईर, तुळशीराम पाटील, जगदीश शेळके, विनायक शेळके, चेतन शेळके, विनोद पाठे यांच्यासह इतर मान्यवर आणि खेळाडू उपस्थित होते.

## रोहित शर्मासाठी 'सीएसके'ची खास पोस्ट

### चाहत्यांची मने जिंकली

**चेन्नई : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२४च्या हंगामापूर्वी मुंबई इंडियन्सकडून रोहित शर्माला कर्णधारपदावरून हटवण्यात आले आहे. चेन्नई सुपर किंग्ज (सीएसके)ने मुंबई इंडियन्सच्या माजी कर्णधाराच्या सन्मानार्थ एक खास व्हिडीओ शेअर केला आहे.

चेन्नई संघाने रोहित शर्माबद्दल आदर व्यक्त केला. सीएसकेने इन्स्टाग्रामच्या माध्यमातून एक व्हिडीओ शेअर केला आहे, ज्यामध्ये २०१३ ते २०२३पर्यंतचे रोहित शर्मा आणि महेंद्रसिंह धोनीचे फोटो व्हिडीओच्या रूपात दिसत आहेत.

व्हिडीओमध्ये समाविष्ट केलेला फोटो नाणेफेकीच्या वेळचा आहे, जेव्हा दोन्ही कर्णधार सामन्यापूर्वी नाणेफेक करायला जात होते. चेन्नईने व्हिडीओला कॅप्शन देताना लिहिले, '२०१३ ते २०२३: उत्साही आव्हानाचे दशक! खूप आदर, रोहित!'




# खेळातून शिकायला मिळते -संजय कडू

## मॉडर्न स्कूलच्या क्रीडा महोत्सवाचे पारितोषिक वितरण

**वाशी : रामप्रहर वृत्त**

पराभव पचविण्याची क्षमता आणि विजयाचा उन्माद न करणे हे गुण खेळातून शिकायला मिळतात, असे प्रतिपादन शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त टेबल टेनिसपटू संजय कडू यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील मॉडर्न स्कूलच्या क्रीडा महोत्सवाचा पारितोषिक वितरण सोहळा शनिवारी (दि. १६) झाला. त्या वेळी कडू बोलत होते.

११ डिसेंबरपासून सुरू झालेल्या क्रीडा महोत्सवाची सांगता शनिवारी झाली. या महोत्सवाच्या पारितोषिक वितरण समारंभास 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य तथा शाळा समितीचे अध्यक्ष दशरथ भगत, पेंटॅथलॉन खेळाडू मयंक चाफेकर, नवी मुंबई मनपा शिक्षण विभाग प्रभारी प्रशांत म्हात्रे, प्राचार्य सुमित्रा भोसले, मराठी प्राथमिक मुख्याध्यापक रवींद्र वाघ, विद्यालयाचे सर्व विभागप्रमुख, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.



**शालेय विद्यार्थ्यांनी खेळाला दुय्यम स्थान न देता प्रथम संधी द्यायला हवी, कारण खेळ तुम्हाला जीवनामध्ये खूप काही शिकवून जातो.**
**-मयंक चाफेकर, पेंटॅथलॉन खेळाडू**

**सर्वसामान्यांना व्यासपीठ देणारी रयत शिक्षण संस्था ही एकमेव संस्था असून आपण सर्व 'रयत'चे विद्यार्थी असल्याचा मला अभिमान वाटतो.**
**-दशरथ भगत, शाळा समितीचे अध्यक्ष**



# पेणमध्ये सोल्जरथॉन स्पर्धेत स्पर्धकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पेण : प्रतिनिधी**

हनुमान व्यायाम शाळेला १०० वर्ष पूर्ण झाल्याने व एक धाव सैनिकांसाठी विजयी दिवसाचे औचित्य साधून प्रशिक्षक राजेश अनगत यांच्या पुढाकाराने सोल्जरथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी हनुमान व्यायाम शाळा ते आंबेगाव बसस्टॉप अशी पाच किमीची स्पर्धा झाली. कार्यक्रमास डॉ. अशोक भोईर, दशरथ भोपतराव, नरेन जाधव, माजी सैनिक मिलिंद बोचरे, अजय पाटील, माजी उपनगराध्यक्ष दिपक गुरव, रुपेश कदम, डॉ. मानसी कदम, आदींसह मान्यवर उपस्थित होते.

माजी सैनिक मिलिंद बोचरे यांनी सांगितले की, आपले आरोग्य हे उत्तम राहण्याच्या दृष्टिकोनातून अशा स्पर्धांचे आयोजन सर्वत्र होत असून यापुढे दरवर्षी ही स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. डॉ. सुरेश भोईर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

राजेश अनगत यांनी स्पर्धेच्या आयोजनामध्ये ज्यांचे सहकार्य लाभले त्यांचे आभार मानले. १७ वर्षेखालील मुली-मुले, १७ ते ४५ वयोगट पुरुष व महिला, खुला गट महिला व पुरुष, ज्येष्ठ नागरिक अशा गटात ही स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धकांना मेडल व प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.



(छाया : इजाज मनियार)

# पनवेलमध्ये विजय दिनानिमित्त आयोजित मॅरेथॉनला प्रतिसाद

**पनवेल : वार्ताहर**

खांदा कॉलनी पनवेल येथे विजय दिवसानिमित्त रविवारी (दि. १७) विजय रन मॅरेथॉन आयोजन करण्यात करण्यात आले होते. याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

१६ डिसेंबर १९७१च्या युद्धातील ऐतिहासिक विजयाचे शिल्पकार ठरलेल्या भारतीय लष्कराच्या शूर जवानांच्या शौर्याला व बलिदानाला विनम्र अभिवादन करण्यासाठी ही मॅरेथॉन आयोजित करण्यात आली. १६ डिसेंबर १९७१ रोजी भारताने पाकिस्तानवर विजय मिळवला होता आणि त्या युद्धात ३९०० भारतीय सैनिक शहीद झाले होते. त्यांना मानवंदना म्हणून गेले सॉलिडट्रेशन (इंडिया लिमिटेड) वतीने रविवारी विजय रन मॅरेथॉन आयोजित करण्यात आले. संपूर्ण भारतात विविध ठिकाणी तीन, पाच आणि २१ किमीपर्यंतच्या विजय रन मॅरेथॉन आयोजन विजय दिनानिमित्त करण्यात येते. या वेळी विजय दिनानिमित्त शहीद झालेल्या ३९०० शहिदांना मानवंदना देऊन मॅरेथॉनला सुरुवात करण्यात आली, तसेच जखमी जवानांच्या कार्यालाही सलाम केला.

मॅरेथॉनमध्ये १००हून अधिक लोकांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमात फिटीस्तान एक फिट भारतचे कॅप्टन संजय मोरे, कॅप्टन नियती ठक्कर, एमआयडीसीचे अधीक्षक अभियंता बाळासाहेब झांजे, इंडियन नेव्हीच्या चुकार सेकंड स्कॉडर्न नेव्हल स्टेशन करंजा या टीमचे तसेच अल्केश शहा व भावेश धनेशा आणि सिद्धेश मोरे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. पनवेलच्या गुड मॉर्निंग रनर्स क्लब आणि जय हिंद फिटनेस ग्रुपच्या सदस्यांचे विशेष सहकार्याबद्दल विशेष आभार मानण्यात आले.



# रोह्याच्या एमडीएम फ्युचर स्कूलमध्ये वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साहात



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहे तालुक्यातील एमडीएम फ्युचर स्कूल कोलाड वरसगाव येथे तीन दिवस सुरू असलेला वार्षिक क्रीडा महोत्सव मोठ्या उत्साहात झाला.

एमडीएम फ्युचर स्कूलमध्ये १४ ते १६ डिसेंबरदरम्यान विविध क्रीडा स्पर्धा झाल्या. पहिल्या दिवसाचे उद्घाटन संस्थेचे चेअरमन संदीप तटकरे यांच्या हस्ते झाले. तीन दिवसांच्या स्पर्धा नर्सरी ज्युनिअर सीनियर ते इयत्ता १२वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी तसेच चिमुकल्यांसाठी बुक बॅलेंसिंग, सॅक् रेस, फिश रेज, पोटॅटो रेस, हॉपिंग रेससारख्या स्पर्धा आयोजित केल्या होत्या, तर मोठ्या विद्यार्थ्यांसाठी १०० मीटर, २०० मीटर ४०० मीटर ८०० मीटर १५०० मीटर, रिले रेस, उंच उडी, लांब उडी, गोळा फेक, थाळी फेक, भालाफेकसारख्या स्पर्धा व पालकांसाठी बुक बॅलेंसिंग, संगीत खुर्ची, रनिंग रेस, क्रिकेटसारख्या स्पर्धा आयोजित केल्या गेल्या. तिसऱ्या दिवशी कार्यक्रमाची सांगता झाली.

विद्यार्थ्यांच्या प्रत्येक हाऊसची तुकडी म्हणजेच फायर वॉटर अर्थ आणि एअर हाऊस यांनी आपआपली प्रेझेंटेशन केली. शाळेच्या कराटेपटूंनी आपले कौशल्य सादर केले.

प्रमुख पाहुणे म्हणून कोलाड पोलीस अधिकारी अजित साबळे यांची उपस्थिती लाभली. त्यांच्यासह संस्थेचे सचिव प्रकाश सरकले, रजिस्ट्रार अजित तेलंगे, एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर देवेंद्र चांदगावकर, प्राचार्य योगिनी देशमुख यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.




## राष्ट्रीय किशोर-किशोरी खो-खो स्पर्धा

# तिसऱ्या दिवसावर महाराष्ट्राचे वर्चस्व

### किशोरी गटात उत्तर प्रदेशचा, तर किशोर गटात उत्तराखंडचा केला पराभव

**टिपटूर (कर्नाटक) : वृत्तसंस्था**

खो-खो फेडरेशन ऑफ इंडियाच्या मान्यतेने आणि कर्नाटक खो-खो असोसिएशन आयोजित ३३वी राष्ट्रीय किशोर-किशोरी खो-खो स्पर्धा कर्नाटकमधील टीपटूर येथे सुरू आहे. या स्पर्धेत तिसऱ्या दिवशी महाराष्ट्राच्या दोन्ही संघांनी साखळी सामन्यात विजय मिळवत गटात अव्वल कामगिरी साधली. किशोरी गटात उत्तर प्रदेशचा, तर किशोर गटात उत्तराखंडचा पराभव केला.

कल्पतरू मैदानावर सुरू असलेल्या स्पर्धेत किशोरी गटात महाराष्ट्रने उत्तर प्रदेशचा ३४-१४ असा एक डाव २० गुणांनी पराभव करीत गटात अव्वल कामगिरी केली. महाराष्ट्र संघातर्फे मैथिली पवार (१.३० मि. संरक्षण व ८ गुण), स्नेहा लोमकाणे (२.४० मिनिटे संरक्षण), वैष्णवी चाफे (२.५० मि. संरक्षण), अक्षरा डोळे (१.१० मि. संरक्षण व ४ गुण), मुग्धा विर (२.५० मि. संरक्षण), तर रिद्धी



चव्हाण (१.२० मि. नाबाद संरक्षण व २ गुण) यांनी चांगला खेळ करत महाराष्ट्राचा विजय सोपा केला. उत्तरप्रदेशतर्फे संजना भारद्वाज (२ मि. संरक्षण व २ गुण), अनु प्रग्या (४ गुण) यांनी चांगला खेळ केला.

किशोर गटात महाराष्ट्रने उत्तराखंडचा ४४-१४ असा एक डाव ३० गुणांनी पराभव केला. विजयी संघातर्फे ओंकार सावंत (२.३० मि. संरक्षण व २ गुण), भीमसिंग वसावे (२ मि., १.३० मिं. संरक्षण व ६ गुण), हारद्या वसावे (२ मि. संरक्षण व ८ गुण), आदेश पाटील (१.३० मि. संरक्षण व गुण ८) यांनी केलेल्या उत्कृष्ट खेळ केल्यामुळे विजय सोपा झाला. पराभूत संघातर्फे कुणाल आर्या (२ गुण) याने चांगला खेळ केला.

किशोरी गटात उर्वरित सामन्यात कोल्हापूरने विदर्भ संघावर एक डाव १८ गुणांनी (२८-१०) मात केली. वेस्ट बंगाल संघाने पाँडेचेरीचा एक डाव ४ गुणांनी (१८-१४) अशी मात केली. तामिळनाडूने छत्तीसगडचा एक डाव १० गुणांनी (२६-१६) असा पराभव केला. केरळने गुजरातचा एक डाव २ गुणांनी (२२-२०) पराभव केला.

किशोर गटात उर्वरित सामन्यात कोल्हापूरने पाँडेचेरीचा एक डाव ४ गुणांनी (१८-१४) असा पराभव केला. मध्य भारतने चंदीगडचा एक डाव १० गुणांनी (२२-१२), तर छत्तीसगडने उत्तर प्रदेशवर २ गुणांनी (२८-२६) मात केली.

## श्री उद्यानगणेश मंदिर चषक शालेय कबड्डी स्पर्धा

**मुंबई :** श्री उद्यानगणेश मंदिर सेवा समितीतर्फे मुंबई-ठाणे परिसरातील १७ वर्षांखालील मुलामुलींच्या शालेय संघांची श्री उद्यानगणेश मंदिर चषक कबड्डी स्पर्धा ८ व ९ जानेवारी २०२४ दरम्यान शिवाजी पार्क येथील छत्रपती शिवाजी महाराज उद्यानमध्ये आयोजित करण्यात आली आहे. शालेय कबड्डी संघांनी प्रवेश अर्जासाठी स्पर्धा प्रमुख प्रकाश परब (९३२१२९३६३८) अथवा व्यवस्थापक संजय आईर (८६५५२३३७७८), श्री उद्यान गणेश मंदिर कार्यालय (२४४६६६३४), स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज उद्यान, दादर-पश्चिम, मुंबई-२८ येथे २० डिसेंबरपर्यंत संपर्क साधावा.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com